
स्वीटी महाले
असीम

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# असीम

## लेखिका : स्वीटी सुभाष महाले

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# असीम

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# असीम

लेखिका : स्वीटी सुभाष महाले

फोन नंबर - 8308732305

Emailid- sweetimahale2018@gmail.com

पत्ता - जाचकवाडी, बेलापूर, तालुका- अकोले,
जिल्हा- अहमदनगर. (सध्या - पुणे)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १९ मे २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

मी स्वीटी सुभाष महाले.

एक वाचक आणि लेखक.



हे माझं ईसहित्यवर प्रकाशित होणारे तिसरे पुस्तक. नेहमीप्रमाणे खूप आनंद होतोय. शाळेत असताना वाचनाची मात्र प्रचंड आवड होती. याच आवडीतून हळूहळू लिखाणाकडे वळले. वाचकांच्या मनाला मिळणारा आनंद आणि वाचनातून त्यांना मिळनारे समाधान हीच काय ती पावती. अर्थातच अखंड ज्ञानसंपदा माझ्या अभ्यासासाठी अजून बाकी आहे. शिकण्याची धडपड चालू आहेच याच धडपडीत केलेला हा प्रयत्न. आपले आंबट गोड प्रतिसाद देत राहा. खरं तर दोन वर्षांपूर्वी "असीम " च लिखाण झालेलं होतं. बरेच दिवस नुसती पडून असलेली ही गोष्ट आज प्रकाशित होतीय. खरं तर लिखाण वगैरे जमेल हा विश्वास दिला तो वाचकांनी. पहिल्या पुस्तकाला वाचकांनी अक्षरशः डोक्यावर घेतलं. त्यासाठीचे उत्फुर्त प्रतिसाद आजही येतात.फार आनंद वाटतो. असेच प्रतिसाद देत राहा आणि वाचत राहा.

✍️ स्वीटी सुभाष महाले.

## प्रस्तावना

"असीम" कधीही न संपणारे, ही गोष्ट ही अगदी अशीच वाचकाला शेवट पर्यंत गुरफटून ठेवणारी. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शेवटी पर्यंत सस्पेन्स टिकवून ठेवणारी ही कथा वाचताना वाचक गुरफटून जातो. एकामागे एक घडणारे प्रसंग डोळ्यापुढे उभे राहतात.जुन्या आठवणींत रमलेली नायिका जेव्हा त्या जुन्या आठवणींना उजाळा देत त्याच्या शोधत निघते. त्यातून रहस्याची कथा उलगडत जाते.हळूहळू घडणारे प्रेम. निवृत्तरीत प्रश्न वाचकाला शेवट पर्यंत घेऊन जातात. आणि नेहमीप्रमाणे शेवट थक्क करणारा ठरतो. कथेचं पाहिलं पान ते शेवटचं पान तुम्ही मनापासून एन्जॉय करता. थ्रिल , सस्पेन्स ,रोमान्स  या सगळ्या गोष्टी एक म्हणजे " असीम " दोन तासांचा हा विरंगुळा  तुम्हाला देखील नक्कीच आवडेल.

अर्पणपत्रिका

सतत लिहिण्यास प्रेरणा देणारे नाना, नानी, ताई दादा

आणि

नेहमी लिहिण्यासाठी प्रोत्साहन करणाऱ्या सर्व

मित्रमैत्रिणी आणि वाचकांस समर्पित...

# असीम

सदर कथा ही पुर्णपणे काल्पनिक कथा असून याचा कुठल्याही जिवंत किंवा मृत व्यक्तीशी कुठल्याही प्रकारचा संबंध नाही. तसे आढळल्यास तो केवळ योगायोग समजावा.

रात्री उशिरापर्यंत मी माझ्या कॅबिन मधे बसून होते. बऱ्याच वेळापासून रात्रीच्या अंधारात भयंकर वाटतील असे भिंतीवर ओरखडून होणारे आवाज थांबले. काही वेळ मी सुटकेचा श्वास घेतला, डॉक्टर असून मी कधी या स्थिती मध्येही असेल असं मला स्वतःला देखील वाटलं नव्हतं, गेल्या दहा दिवसांत मी प्रत्येक क्षणाला मरत होते, त्याचा हसणारा प्रेमळ चेहरा डोळ्यासमोर जसाच्या तसा उभा राहायचा, मी जुन्या आठवणींत रमुन जायची, काही क्षणासाठी झालेली शांतता पुन्हा त्या भयानक आवाजाने ढवळून निघाली, काहीश्या तंद्रीत हरवलेली मी दचकून जागी झाले, पूर्णपणे काटेकोर लक्ष देता यावं म्हणून माझ्या कॅबिन शेजारच्याच वॉर्ड मध्ये त्याला ठेवलं होतं. काहीश्या थरथरत्या हाताने मी त्याच्या खोलीच्या खिडकीतून डोकवण्यासाठी काच खाली केली. खोलीभर नजर फिरवून तो दिसला नाही. मी दचकून सभोवताली नजर फिरवली, पुन्हा नीट पाहावं म्हणून मी खिडकी जवळ तोंड नेत आत डोकावण्याचा प्रयत्न केला. तोच खिडकीवर

झेपावलेला रक्ताळेला चेहरा आणि गालावरच्या ओरखडयावर नजर गेली. मी घाबरून किंचाळत मागे सरकले.

"ओ मॅडम कितीदा सांगितलं अहो येडाय तो. नीट झाला की घेऊन जा पुन्हा निदान रात्री तरी आम्हाला डोकेदुखी देऊ नका. जावा घरी." शाम म्हणजे हॉस्पिटलचा वॉचमन आपल्या करड्या आवाजात ओरडत म्हणाला. मी स्वतःच डॉक्टर आहे हे शामलाच काय स्वतःला देखील विसरायला झालं होतं, "माफ करा. छोट्या तोंडी मोठा घास घेतोय, मान्य आहे पेशन्ट तुमचं जवळच आहे. पण किती जगणार रात्र रात्र भर ते ढोरासारखं किंकाळ्या मारत, मी बाहेर बसून मला ऐकवत नाही तुम्ही इथे कसे राहता? ते काही नाही मी पांडूला संगतो तुम्हाला घरी सोडायला आज दहा दिवस झाले. तुमची हालत पाहवत नाही, हा आहे तरी कोण नक्की? आणि या येड्यासाठी का तुम्ही आकाश पातळ एक करताय?"

हॉस्पिटलमध्ये वॉचमन म्हणून काम करणारा श्याम जे काही सांगत होता त्यातलं एक वाक्य मात्र कानात शिसं ओतल्यासारख त्याला झोंबलं.

का या वेड्यासाठी आकाश पातळ एक करता? सहज उच्चारलेलं त्याच वाक्य असं काही लागलं की, क्षणात रागाची एक कळ माझ्या मस्तकातुन गेली. "वेडा नाही तो." क्षणात

बदलेला उग्र स्वर त्याला ही जाणवला असावा. शाम क्षणभर नरमला.

कधी नाही तर त्याला मी असं ओरडून उत्तर दिलं हे त्यालाही अपेक्षित नसावं. कारण नेहमी शांतपणे बोलणारी मी आज असं रागवेल याचा अंदाज नसल्याने तो दचकून काहीसा गोंधळला, “अ… माफ करा  चुकलं.. मला फक्त तुम्ही स्वताची काळजी घ्या इतकंच म्हणायचं होतं.” तो काहीसा बिचकत म्हणाला, “रात्रीचे एक वाजत आलेत तुम्ही अजून जागे आहात.”

मी क्षणात नरमले, भूतकाळ राहून राहून मला छळत होता. गाडी बाहेर काढून मी घराच्या दिशेने भरधाव वेगाने निघाले. वाटेत मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला होता. गाडीच्या काचेवर जोरात आदळणारे पावसाचे थेंब काही केल्या वायपरला जुमानत नव्हते, रस्त्यावर गर्दी असायचा तर प्रश्नच नव्हता रात्रीचे 1 वाजेलेला, त्यातल्या त्यात सुनसान पडलेल्या रस्त्यावर धोधो पाऊस कोसळत होता. रस्ता ओळखीचाच असंल्याने वेग तसाच ठेवत मी भरधाव निघाले. रोज रात्री उशिरा कधी तरी अशीच भरधाव गाडी घरी आणुन बिछान्यात पडायचं आणि झोपेची गोळी घेऊन पडून राहायचं हाच आता माझा दिनक्रम झाला होता. कदाचित त्या गोळयाही आता थकल्या असाव्यात त्यांना दिलेली

झोपवण्याची जबाबदारी आता त्यांनीही  नाकारली होती, दहा पंधरा मिनिटात पावसाचा जोर काहीसा ओसरला तसा रस्ता स्पष्ट दिसायला लागला.

घर अजून पंधरा-वीस मिनीटांवर असेल तोच माझा फोन खाणाणला, “हॅलो, सुर्वी मॅडम, तुमच्या पेशन्टने हाताची नस कापून घेतलीय; खूप रक्त चाललंय, तुम्ही लवकर या.” शेवटचे शब्द  पुसटसे ऐकू आले असं तील मी कचकन ब्रेक दाबला. पुन्हा वाढलेला पावसाचा जोर... याची पर्वा नव्हती. काही मिनिटातच मी हॉस्पिटलमध्ये पोहोचले, डॉक्टर अवस्थिनी तो पर्यंत तिथून हलवून ओटी मध्ये नेलं होतं, नशिबाने त्याला काही धरधार न मिळाल्याने आत्महत्येचा तो प्रयत्न फार काही यशस्वी झाला नव्हता. हाताच्या वाढलेल्या नखांनी हाताच्या नसेला इजा पोचवण्याचा प्रयत्न त्याने केला होता, त्याच ते भयानक रूप पाहवत नसल्याने मी कधी त्याला नीट पाहिलं नव्हतं, ओटी मध्ये पोहोचल्यावर डॉक्टर अवस्थीनि हाताचं वाहणार रक्त थांबवलं होतं. हलक्या पावलांनी मी त्याच्या जवळ गेले, का माहीत नाही पण त्याचा तो बेबस चेहरा मला पाहवत नव्हता, तो बेशुद्ध अवस्थेत निश्चल पडला होता, पूर्ण चेहऱ्यावर हातांनी ओरखडे ओढलेले दिसत होते, अंगावर जागी जागी झालेल्या जखमा पाहून नकळत माझ्या डोळ्यात पाणी आलं. एक एक करून छोट्यातली

छोटी जखम ही मी काळजीपूर्वक साफ केली, तो अजूनही ग्लानीत होता. शांत पहुडलेली सुर्वी, काहीतरी सांगत असावी असं वाटलं, रक्ताळेली नखं कपताना तीची हलकीशी हालचाल जाणवली. पांडू बोलवून पेशन्टला वॉर्ड मध्ये हलवा असं सांगून डॉक्टर अवस्थी निघून गेले, निवासी डॉक्टर असंल्याने नेहमीच रात्री अपरात्री बोलावणे यायचेच याचा ताण मात्र चेहऱ्यावर दिसत होता. ते जास्त काही चर्चा न करता आपल्या निवासी घराकडे वळले.

मी मात्र बराच वेळ तो तिथंच बसून होते, तो शुद्धीवर नाही म्हणून पांडू ही काहीसा आरामात येत असावा.

त्याचे हलके हलणारे हात मला जाणवले, “सुर्वी,” त्याने कुजबुजल्या स्वरात मला हाक मारली. त्या कुबुजल्या स्वराने माझ्या अंगावर काटा उभा राहिला. तरीही हिम्मत करून मी त्याच्या चेहऱ्यावर नजर फिरवली. तो अजूनही तंद्रीतच होता, पण “सुर्वी” नाव घेतलं त्याने. अजूनही मी त्याच्या लक्षात आहे या विचारानेच माझी कळी खुलली.

“मला ओळखलं?” मी ही हलक्या आवाजात त्याला हाक मारली. पण त्या वेळी मात्र प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी तिथून तो उठणारच की माझ्या हाताची पकड घट्ट झालेली मला

जाणवली. मी थरथरत्या नजरेने हातावर नजर फिरवली. त्याने माझा हात घट्ट धरून ठेवला होता.

“सुर्वी...” त्याने यावेळी मारलेली हाक रोजच्यासारखीच वाटली, मी त्याच्या चेहऱ्यावर ओझरती नजर फिरवली, आणि आश्चर्य म्हणजे काय तो माझ्याकडे पाहून हलकेच हसला, तेच निरागस हसू कित्येक वर्षांनि मी पाहत होते, पण तेही तेवढ्यापुरतेच.

त्याच्या मागे येऊन उभा राहिलेला पांडू हे सगळं पाहत होता, जागेवर खिळलेल्या त्याच्या आकृतीकडे मी एकवार नजर फिरवली. तो जागेवर खिळला होता. संपूर्ण हॉस्पिटलमध्ये मधे आम्ही दोघेच उरले होतो काहीतरी विपरीत घडल्या सारखी भयाण शांतता होती.

“सूरी...!” त्याने मोठ्या कष्टाने शद्ब उच्चारले. त्याचा नेहमीचा प्रांजळ स्वर ऐकून मी भूतकाळात हरवले,

सोमवारचा पहिला तास होता, संथ गतीनं चालत एक भक्कम धूड दरवाजातून आत आलं, आ करून आम्ही बघत ते बघायला लागलो, सहा फूट आणि रुंदीने चांगला जाड म्हणजे थोडक्यात माझ्या माहितीतल्या एकाही असा महान आत्मा नव्हता ज्याच्या हाताच्या कवेत हे नाजूक शरीर बसू शकेल असं हलणार डुलणार

भक्कम शरीर आत येतना, एखादा रबराचा बॉल टप्पी उडी खात यावा तस ते धूड दिसत होतं. हलकं हलकं बॉउन्स होणारं ते नाजूक शरीर लयबद्द बॉउन्स होतं होतं. जास्त काही नाही साधारण शंभर एकशे वीसच्या पुढे वजन असावं असा माझा प्राथमिक अंदाज होता, पण ते धूड जास्त जवळ आल्यावर ते अंदाजाचे इमले धडा धड खाली कोसळले, तो बॉल दीडशेच्या खाली नसेल असं पक्क गणित मी मांडल आणि ते बरोबरं ही असावं.

"हॅलो, गुड मॉर्निंग" म्हणत ते नाजूक शरीर माझ्या शेजारी येऊन बसलं, माझी थंड रिऍक्शन पाहून ते काहीसं गार झालं असावं, तस पाहता ते माझ्या पेक्षा जास्त चंचल वाटलं.

"Hi, मी श्रीयश." त्याने बत्तीशी दाखवत हात पुढं केला, मला तर काही इंटरेस्ट नव्हता त्याच्या बरोबरं hi, hello करण्यात.

मख्ख चेहऱ्याने मी त्याच्या हाताकडे पाहून थंड आवाजात "hello" म्हंटल. त्याने ज्या वेगाने हात पुढे केला होता त्याच वेगाने मागे घेतला.

आमचा दहावी 'क' चा वर्ग सुरू झाल्या पासून दुसरा महिना होता. हा नवीन आलेला प्राणी  सोडला तर वर्गातला प्रत्येक जण आपल्या पासून चार हात लांबच राहायचा. मी प्रकारच तसा होते मला फालतू ची बडबड आवडायची नाही आणि जास्त कोणी

बोलण्याचा प्रयत्न केल्यास काय होते हे प्रत्येकाला चांगलेच माहीत होते. म्हणून आपलं चार हात लांब बरं असं म्हणून सगळे मला माझी पब्लिक privacy देत होते, पब्लिक privacy म्हणजे सामाजिक ठिकाणी ही कोणी माझ्या व्यतिगत आयुष्यात ढवळा ढवळ करत नव्हते, म्हणजेच उगाच चूचेगिरी करून मला बोर करत नव्हते.

म्हणून माझ्या शेजारचा बेंच कायम रिकामा असायचा. कुणी बसायची हिम्मत तो काय करेल की हा प्राणी मोकळी जागा दिसली म्हणून तिथे थडकला ?, दुसरीकडे alredy सगळे डबल बसत आल्याने मला माझ्या शेजारची जागा दान करणे भाग होते माझ्या मर्जीच्या विरुद्ध का होईना त्या नाजूक शरीराने माझ्या ऐसपैस बेंचचा तीन चतुर्थांश भागाहून जास्त म्हणजे जवळपास 80 % भाग तरी बळकावला होता. आता माझ्याच राज्यात मी आश्रित होते, शेजारच्या राज्याचा आर्थिक विस्तार पाहतां माझं राज्य काही अंशी दान करणे मला भाग होते, आता न बोलुन सांगता कुणाला! दात ओठ खात एक तास तशीच स्वतःला थंड करत बसले, आता राग शांत झाला पण माझ्या सुपीक डोक्यात नानाविविध कल्पना डोकायला लागल्या, हे नाजुक धूड मला काहीही करून माझ्या राज्यातून हकलायचे होते. डोक्यात रणनीती चालू झाली.

तसा लहानपणी पासूनच माझा स्वभाव जरा अतरंगी आहे, मला माणसं जवळ आली का जास्त प्रॉब्लेम वाटतो. जस की मला आठवतंय अगंदी पुढचे दोन दात दुधाचे आणि भिंतीला धरून चालण्याचे तेवढं येत होतं की माझी मावशी आणि तिची सासू घरी आलेली, पाहुणे आणि पाहुणचार असे तर काही कळत नव्हते पण एक मात्र कळत होतं, मावशी आणि मावशीची सासू मला खुळखुळा वाजवून दाखवत होते आणि हसून माझ्या गालाला त्रास देत होते मला न त्या खुळखुळयाचा आवाज आवडत होता ना माझ्या गालाला झालेला त्रास, मावशीच्या सासूचे केस असे काही पकडले की मला माझ्या शरीराला धरून ओढणारे दोन जण आणि मी केसांना घट्ट धरून जी पकड बनवली, की ती जर सुटली तर जणू काही माझ्या वयवर्षे  दोन पर्यंत कमावलेल्या प्रतिष्ठेचा प्रश्न उभा राहणार होता.

Chocolate चे अमिष ही माझा राग control करू शकले नव्हते शेवटी मी अजून दोन तीन चॉकोलेट चे budget वाढल्याने ने माघार घेतली, मावशीच्या सासूशी आज ही माझं काही खास पटत नाही.

दुसरी गोष्ट आठवते ती मी इयत्ता दुसरी मध्ये असेल, मला माझ्या शेजारी ही कोणी बसलेलं आवडायचं नाही, माझ्या शेजारी

एक मुलगी बसायची वर्गात सगळ्यात हुशार मला मात्र तिचा खूप राग यायचा, तिची हुशारी लपवत ती शांत बसून जरी असं ली तरी मला ती माझ्या डोळ्यासमोर नको होती, शेवटी मला जे हवं ते मी मिळणारच होते, आणि काहीच दिवसात मी ते साध्य केलं.

तेव्हा पासून माझ्या राज्यात मी एकटीच होते माझा चांगुलपणा ( म्हणजे माझ्यासाठी तो चांगुलपणा दुसऱ्यांसाठी मात्र डोक्याला ताप ) तर हा सगळ्या शाळेत प्रख्यात होताच त्या मुळे फारसं कोणी माझ्या नादाला लागायचं नाही, इयत्ता दुसरीत असंताना जर एवढा खुनशीपणा माझ्यात होता तर आता तर या नाजूक शरीराला हकलायला मला कितीसा वेळ लागणार होता,

काय करावं याचं गणित चालू होतं. पहिला तास संपतच आला होता की सरांच या नवीन गोष्टीकडे लक्ष गेलं, माझ्या शेजारी चक्क कुणीतरी बसायची हिम्मत केली, याच आश्चर्य वाटलं असावं नक्कीच त्यांना. पूर्ण वेळ आळीपाळीने ते माझ्याकडे आणि शेजारच्या नाजूक देहाकडे पाहत होते, आपल्या वर्गात नवीन मुलगा आज पासून दाखल झाला आहे. कसं वाटतंय श्रीयश? तुझं introduction दे सर्वांना.

साजूक पुन्हा एकदा बॉउन्स झाला उठताना त्याची ढेरी बेंचच्या पुढच्या भागाला धडकली. “नमस्ते एवरी वन मी श्रीयश

लोढी, त्याच आडनाव ऐकून मला हसू कंट्रोल झालं नाही," लोढू!!!!!! मी खि खी करत त्याला आवाज दिला माझ्या सोबत अजून ही काही लोक हसले असं तील बहुतेक, सर पुन्हा एकदा ओरडले, "गप्प बसा रे!" मराठी खूपच चांगली होती त्याची, चांगली म्हणजे सर्वांचीच चांगली असं ते मात्र याची जरा जास्तच चांगली होती..

दुसऱ्या तासाला मराठीच व्याकरण मॅडम समजून सांगत होत्या, हे महाशय तर जणू व्याकरणाचे जन्मदातेच होते, व्याकरण आणि त्याची सगळी उत्तर तोंडपाठ होती, मराठी त्याला फार आवडते असं  तो तास सुटते वेळी माझ्याकडे पाहून म्हणाला, आता मला अजून एक कारण मिळालं त्याला हुसकायचं मला हुशार आणि चमचेगिरी करणारे लोक माझ्या शेजारी बिलकुल नको असतात.

डोक्यात प्लॅनिंग सुरु झाली. तास ऑफ जाणार होता. सर आले नव्हते, मी हळूच स्कर्टच्या खिशातून मोबाइल काढला. गेम खेळत बसले, शेजारून काहीतरी खुडबुड चाललेली जाणवली तशी मी त्या साजूककडे मान वळवली, त्याने जेवणाचा डब्बा खोलला होता, अहाहा…काय सुंदर खमंग वास येत होता काहीतरी चटपटीत आणि चवदार आणलेलं दिसत होतं, त्याला शेजारी

बसून तीन तास तरी झाले असं तील पण मी एक शब्दाने त्याला ओ दिली नव्हती, आता डब्यातल्या गोष्टी मागू कशा? पण काही का असेना त्या वासाने पोटात भूक कळवळली.

त्याने डब्बा व्यवस्थित खोलला आणि माझ्या समोर ठेवला.!!! आह ..!! जणू स्वर्गच .त्याने खा म्हणायच्या आतच त्यावर ताव मारायला सुरुवात केली, आह!!! काय चव होती त्या जेवणाला, नुसती बोट चाटत राहावं अशी, खाता खाता आमच्या मेसच्या काकूंच्या हातची अळणी भाजी आठवली…ह्या काय आठवतेय मी? पण डब्बा संपवला आणि बोटं चाटत ढेकर दिला, त्याने पाण्याची बॉटल समोर केली. ती घटघट प्यायले, किती दिवसांनी पोट शांत झाल्यासारख वाटत होतं.

“मिस सुर्वी फोन वापरायला परवानगी नाही आपल्या शाळेत हे highschool आहे कॉलेज नव्हे..!!” तो दात काढत खोचक हासत म्हणाला, त्यावर “ये तू तुझं काम कर मला शिकवू नको.” असं नेहमीच खमक उत्तम जिभेवर आल होतं की ते तोंडाच्या तोंडात गिळलं, कारण आत्ताच मी माझ्या शेजारच्या राज्याची कुमक ढापली होती, लगेच कुरघोडी नको असं मनातल्या मनात म्हणून मी मोबाईल खिशात ठेवला..

जेवणाची सुट्टी झाली मला तर मस्त जेवण करून आता झोप येत होती, मी त्याला माझा डब्बा दिला त्याने तो खोलून शांततेत संपवला, काहीही नाव न ठेवता!! अजूनही आमच्यात काहीच संभाषण नव्हतंच, पण मला आता राहवेना , तरी मी त्याला शेवटचा घास तोंडात टाकताना टोकलच काय रे ते पांचट अळणी बेचव जेवण कसं काय गिळले तू? त्याने हळूच पाण्याचा घोट घेत म्हंटलं अन्नाला कधी नाव ठेऊ नये, “आई म्हणते ना अन्न हे पूर्ण ब्रह्म असं त.”

हम्म जरा जास्तच लक्ष आहे वाटत तब्येतीवर तुझं, आणि तुझ्या आईच, त्याच्या जाडेपणावरचा विनोद ऐकून खरं तर त्याने रागवायला हवं होतं, पण तो रागवायचा सोडून चक्क लाजला, मला हासु आलं...!!

“ये साजूक तुला डान्स येतो का रे?”

“नाही येत. तरी नाचतच चालतो. त्याच्या उत्तराने मला अजूनच हसू आलं. तसा तो ही गडगडाटी हसला, त्याची आई फार सुंदर स्वयंपाक बनवायची रोज आल्या आल्या त्याचा डबा मी फस्त करायची, आता हे रोजचंच झालं होतं तरीही रोज तो माझ्या मेसच अळणी बेचव जेवण गपचूप पणे जेवायचा, हळू हळू आमची गट्टी जमायला लागली जिकडे तिकडे आम्ही आता सोबत

दिसायचो,तो मला सूरी म्हणायचं आणि मी त्याला ‘साजूक’ किंवा ‘लोढू’ असं  म्हणायचे पण हे नाव फक्त माझ्या साठीच होतं दुसरं कोणी तशी हाक मारली तर मात्र काही खैर नव्हती.

माझ्या टोमण्यांना हसून उत्तर देणार आणि मी केलेल्या सगळ्या मस्कऱ्या हसून नेणारा माझा आता पर्यंतचा पहिला मित्र, जो मला अजून पर्यंत कधीच खडूस म्हटले नाही किंवा माझ्या स्वभावाला वैतागून माझ्याशी भांडण केले नाही, मी त्याच्या समोर बहुली दिसायचे, मोटू-पतलूची आमची जोडी प्रसिद्ध झाली ती या कारणाने की मी कोणाची तरी खोडी काढणार आणि आमचा साजूक लोढू जाऊन त्याला सॉरी म्हणणार हे मात्र आता सोबत रोजच झालं होतं.

दिवस मजेत जात होते आता मात्र मला लोढूला काही बोललेलं आवडायचं नाही. कोणी त्याला त्याच्या जाडेपणा वरून चिडवायचा प्रयत्न केल्यास त्याचा पंगा थेट माझ्याशी असायचा, आमची दहावी सुटली तशी साजूक ने जिम सुरू केली, जाडेपणा असंला तरीही तो खूपच चंचल होता, कोणत्या ही कामात अग्रेसर असायचा. आमचे स्वभाव मात्र एकदम विरुद्ध असंले तरी का माहीत नाही आमची मैत्री मात्र फार घट्ट होती, मी माझ्या सगळ्या

गोष्टी त्याला share करायची तसा तो ही माझा bestie होता तासन तास गप्पा मारून ही आमचे विषय संपायचे नाही, लोढू होताच तसा मन मिळवू माझ्या सारख्या खडूसला देखील त्याने माणसात आणले होते, आता हळू हळू त्याच्या सोबत मी बाकी मुलांमध्ये मिसळत होते, माझ्या इतकाच त्याला तो गौऱ्या देखील जवळचा वाटायचा, मला मात्र ते आवडायचं नाही, दहावी संपली, सुट्ट्या मध्ये लोढू ने जिमचा ध्यास घेतला होता पण दम्याच्या त्रासांने त्याला जास्त काही जमत नव्हते.

दिवस जात होते आमची मैत्री अजून घट्ट होतं होती आणि तो दिवस आला दहावीचा निकाल लागला आणि लोढू  त्याच्या गावी जाण्यासाठी निघाला जाताना माझ्या गळयात पडून मुलींसारखा रडला. खूप हळवा होता तो. मला मात्र टिपूसभर पाणी ही महाग झाले होते, पण पुढे जाणारी त्याची पाठमोरी आकृती पाहून मन भरून आलं. थोडं का होईना पण मला रडू आलं, थोडक्यात बरं वाटलं.

दिवस जात होते. आता शिक्षण पूर्ण केलं. प्रॅक्टिस सुरू केली. दरम्यान माझं कोणाशी काँटॅक्ट नव्हता जास्त मित्रमैत्रिणी जमवणे मला कधी जमलंच नाही.

आता माझा स्वभाव मात्र पहिल्या इतका खडूस आता राहिला नव्हता, रागाने धिंगाणा घालण्यापेक्षा मला शांत राहणे जास्त आवडत होते. वर्षे सरली, त्याची आठवण मला नेहमीच तो जवळ असंल्याची जाणीव करून द्यायची. पण तरीही जी मैत्री मी कमावली होती ती मला लोढू ची आठवण करून द्यायची कसा असेल? तो काय करत असेल? आमच्या मध्ये contact नव्हता. त्यामुळे मला त्याच्या बद्दल काहीच माहिती नव्हतं. हा, एक दोनदा त्याने पत्र पाठवलेलं मला शाळेच्या पत्त्यावर. सदाशिव काकांनी मला आठवणीने ते सोपवलं होतं, किती बरं वाटलं होतं ते वाचून. त्यातही त्याचा नंबरं वैगेरे काही दिलेलं नव्हतं, मी सोशल मीडियाला ही बघून बघून कंटाळले होते. तो कधीतरी सापडेल या आशेने कित्येकदा saerch करून ही त्याचा पत्ता काही मला मिळाला नाही, पण त्याने पाठवलेल्या पत्रावर मात्र एक अड्रेस होता, पण तो इथलाच वाटत होतं, तरी मी त्यावरून शोध लावायचं ठरवलं. नुकतीच आरामासाठी म्हणून आठवडा भराची सुट्टी मिळाली होती. पण हा आठवडा माझं आयुष्यच बदलून टाकेल यांची पुसटशी कल्पना देखील मनात आली नव्हती.

दोनशे किलोमीटर दूर असंलेलं एक खेडेगावातून ते पत्र आलं असंल्याचं कळलं. कुठलाच विचार न करता मी सरळ बॅग भरली आणि निघाले साजूकच्या शोधात. पण हा प्रवास माझं

आयुष्य बदलून टाकेल याची पुसटशीही कल्पना नव्हती. एक तासाचा ट्रेनचा प्रवास आणि तिथून पुढे गावाकडे जाणारी बस असा काहीसा तो प्रवास होता. तसा सहसा मला प्रवास आवडत नाही, पण साजूकला भेटायचा मी चंगच बांधला होता. चार-पाच तास तरी प्रवासात जाणार होते. ट्रेन मध्ये मी एक पुस्तक वाचायला घेतलं, एक तासाने मला उतरायचं आहे असं स्वतःला सांगून वाचायला सुरुवात केली. वाचता वाचता जे हरवून गेले की स्टेशन आल्याच ही माझ्या लक्षात आलं नाही. दोन स्टेशन पुढे जाऊन मी उतरले. अरे यार आधीच वेळ होणार जायला त्यात अजून उशीर शीट यार, मी स्वताच्याच डोक्यात मारून घेतलं

बॅग सांभाळत मी पुन्हा मागे जायला गाडी पकडली. रस्त्यात एकाला त्या गावचा पत्ता विचारला. इथून कोणती बस पकडायची? याची  व्यवस्थित माहिती घेऊन मी तिथल्या मुख्य बस स्थानकावरून बस पकडली. बस मध्ये बसल्यावर माझ्या डोक्यात विचार आला, “तिथे जाऊन लोढू भेटलाच नाही तर? राहायचं कुठे? आणि..” असो, होईल. सर्व नीट होईल मी स्वतःचा स्ट्रेस स्वताशीच काहितरी समजावून कमी करत होते.

अजून दोन तीन तास तरी बस मध्ये जाणार होते, पुन्हा अर्ध राहिलेलं पुस्तक वाचायला काढलं, लोक येत होते उतरून जात

होते. माझ्या शेजारी एक म्हातारी बसली होती. तोंडाच बोळक झालं होतं तिच्या. मी तिच्या कडे नजर फिरवली तशी ती गोडशी हसली, तिने हाताने कुठं? असं  खुणावलं. मी गावच नाव तोंडाने सांगितलं. ती पुन्हा हसली. तिने हाताने खुणावत मी ही तिकडेच चाललेत असं  म्हणायचं असावं तिला.  हेच का? असं  मी पुन्हा विचारलं तिला, तिने मान हलवली, तोंडाला हात लावत नकारार्थी खूण केली. कदाचीत तीला बोलता येत नसावं.

गाडी गावच्या रस्त्याला लागली. रास्ता ओबडधोबड झालेला, तशी तिची बडबड वाढली बडबड म्हणण्यापेक्षा ती फक्त खुणावून बोलत होती. काय म्हणत होती मला व्यवस्थित कळत नव्हतं, मी फक्त मान हलवत होते. एवढ्या लांब आलीय खरी पण लोढुचा काही पत्ता सापडला तर बरं, असं  स्वताशीच पुटपुटले, गाडी धूळ उधळत पुढे निघून गेली. बस थांबा असं  लिहिलेली एक पाटी सोडली तर तिथे बस स्टॉप सारख असं  काहीच नव्हतं.

साधारण संध्याकाळ चे चार वाजले असंतील. मी माझी पाठीवरची जड झालेली ट्रॅव्हलर बॅग सांभाळत पुढे निघाले. माझ्या बरोबरं अजूनही काही लोक बस मधून उतरलेली दिसली. सोबत ती म्हातारी होतीच, ती फक्त हसत होती. डोळयाच्या खोबण्या आत गेलेल्या, तोंडात आहे म्हणायला एकही दात शिल्लक नव्हता

पण चेऱ्यावरच ते प्रसन्न हसू मात्र कायम होतं. गाव अजून पुढे आहे असं तिने हाताने खुणावल. मी चालत चालत दहावीत असंताना काढलेला माझा आणि लोढूचा फोटो तिच्या समोर धरला, ती बारीक डोळे करून न्याहाळत होती. काहीसे इशारे करून मी याला भेटण्यासाठी आले आहे असं तिला सांगितल. तिचे हावभाव पाहून मला अजूनच टेंशन आलं, कारण तो फोटो पाहुन फोटोतली व्यक्ती तिला थोडी ही ओळखू येईना. तरी एक आशा म्हणून मी गावाकडे निघाले. थोडी चौकशी करून मी आधीच ऑनलाइन बुकिंग केलेल्या हॉटेल वर थांबणार होते. ते तिथून वीस एक किलोमीटर वर होतं. चला, निदान विचारपूस तर करूया असं म्हणून मी गावात पोहोचल्यावर लोकांना तो फोटो दाखवून नाव सांगून विचारून पाहिलं, न कोणाला ते ओळखता येईना. एवढा वजनदार माणूस जर गावात असं ता तर चेहरा ही न पाहता ओळखला असं ता.

असं तर कोणी नाही, गावात असं एकाने सांगितलं, हा पत्ता तर इथलाच आहे, मग या ठिकाणा वरुन मला पत्र कुणी पाठवलं असावं? गावात एक छोटंसं डाक घर आहे असं कळलं आजच्या जमान्यातही पत्र व्यवहार चालू आहेत ऐकून छान वाटलं. एक जुनी पडकी खोली वजा डाक घर तिथं होतं, आत गेल्यावर कुणीतरी काम करताना दिसलं, ती करुकुरणारी खुर्ची त्यावर एक खाकी कपडे घातलेला जक्ख म्हातारा बसलेला होता. चष्म्यातून त्याला

फार काही स्पष्टपणे दिसत असेल याची मला जरा शंका वाटली कारण दारात मी उभी असताना माझ्या कडे बारीक डोळे करून तो पाहत होता आणि सोबत म्हणत होता. "आला का रे राम्या, बरं झालं. मी निघतो आता घरला. तू टाळा लावून टाक तेव्हढा." असं म्हणून तो त्या कुरकुरणार्या खुर्चीतुन उठला. काका मी तुमच्या कडे काम होतं म्हणून आले आहे थोडी माहिती हवी होती, त्या जड भिंगाच्या चष्म्यातून त्याने पुन्हा एकदा मला निरखुन पाहिले.

"काम बीम काय नाई उद्या या आता पाच वाजले. आता नई व्हायचं काम."

"काका जास्त वेळ नाही घेणार मी. फक्त पाच मिनिटे खूप लांबून आले हो. थोडी मदत करा." मी केविलवाणा चेहरा करून उभी राहिल्यावर त्याने पुन्हा खुर्ची मधे बस्तान मांडत म्हंटल, "बोल."

समोरचा मळका टेबल त्यावर काम पुरतीच जागा स्वच्छ दिसत होती आजू बाजूला पेपरचे गठ्ठे धूळ खात पडलेलं, आता नाही तरी म्हणा कम्युनिकेशनसाठी कोणी पत्राचा वापर करत नव्हते, आजू बाजूला पाहिल्यावर मला क्षणभर वाटलं की अजून एक गोष्ट आता आठवणीतली झाली. तेव्हा चटकन एक गोष्ट माझ्या लक्षात आली मी लोढू ला मी नाही सोशल मीडिया वर

शोधू शकले पण त्याने प्रयत्न केला असं ता तर मी लगेच सापडले असंते. त्याने का प्रयत्न केला नाही. कदाचित तो विसरला असेल; मला कदाचित तो ओळखणार ही नाही; होप सो, इथे कुठे त्याचा पत्ता मिळावा?

मी माझ्या पर्यंत पोहोचलेलं एकुलत एक पत्र त्यांच्या समोर धरलं. साधारण पंधरा महिन्या आधी मला ते पत्र मिळालेलं. ते अक्षर पाहून ते लोढूचच होतं हे मात्र मी खात्री ने सांगू शकत होते. ते वहीवर कोरून कोरून लिहायची त्याची सवय मला आज ही चांगली आठवते. ते दीड वर्षा आधीच पत्र पाहून त्या पोस्टमन ने काहीशी नाराजीने मान हलवली कारण त्याचे तपशील शोधायला त्याला ती धुळीत पडलेल अजून एखाद रजिस्टर चाळावं लागणार होतं. धूळ झटकून त्याने एक रजिस्टर खोलून त्यात पाहू लागला, मी त्याच्या समोर लोढूचा फोटो ठेवला. “हा इथे आला होता का? याला पाहिलं का कधी?”

त्याने फोटो नीट निरखुन पाहून नकारार्थी मॅन हलवली, “नाई बा.”

तो रजिस्टर मध्ये त्या पत्रा वरची तारीख शोधत होता, पण त्याला ती काही शोधता येईना, मी ते रजिस्टर स्वतःकडे खेचून

घेतलं आणि पटापट सगळी माहिती चाळून पहिली. पण त्यात कुठेच मला हवी ती माहिती सापडली नाही.

"काका, यात तसली काही माहिती नाही. हे पत्र तर मला याच पत्त्यावरून आलं आहे. पण इथे तर याची कोणतीही माहिती लिहिलेली नाही. असं कसं?

"नाही का? मंग आमी नाई काई करू शकत. त्याने रे रजिस्टर खाडकन बंद केलं."

"अरे यार काय? आता मी..."

पण उशीर ही खूप झाला आहे. उद्या येऊ परत असं म्हणून मी पुन्हा माझी राहण्याची सोय केली होती त्या ठिकाणी निघाले. ओह शीट, आता जायची सोय तर होईल ना. मला त्याचंच टेंशन आलं, पण कशीतरी गावातून एक शेवटची बस जात होती. सहा वाजता मला ती बस भेटली. अर्ध्या तासात मी मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचले. भयंकर थकवा आलं होतं. थोडंस खाऊन तशीच झोपी गेले. हॉटेल नाही तर ते गेस्ट हाऊस होतं येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना राहण्याची हि सोय होतं होती आणि मालकाला काही प्रमाणात पैसे ही मिळत असंल्याने तिथे तशी बरी सोय होती.

सकाळी मी पुन्हा परत जायला निघणार होते. कारण गावात कुणालाच काही माहीत नाही म्हणून मग थांबून काहीच अर्थ ही

नाही ना. सकाळी नाही म्हणून मी पुन्हा तिकडे जाऊन व्यवस्थित चौकशी करावी असा ठरवलं. सकाळी सकाळी उन्हाच्या तिरीप घरात यायच्या आत मी तिथं हजर होते. बराच उशिराने तो पोस्टमन आला पुन्हा त्याच म्हाताऱ्या पोस्टमन ने ऑफिस उघडलं, "राम्या मेला कुठं ताडमडलाय कोणास ठाऊक, असं काहीसं तो खिडक्या खोलता खोलाता बडबडत होता..."

"तुला सांगितलं ना एकदा की इथे माहिती नाही."

"म्हणजे आम्ही काय करणार, पण काका शिक्का तर इथलाच आहे ना इथूनच ते पत्र आलाय आणि ते अक्षर ही माझ्या मित्राचंच आहे मला पूर्ण खात्री आहे. एकदा पहा काही माहिती मिळतेय का."

"पण काही असेल तर मिळेल असा काहीसं तो पुटपुटला," तरी माझ्या समाधानासाठी का होईना त्याने पुन्हा एकदा रजिस्टर चाळलं. "हे बघ मला तर आता जास्त काही आठवत नाही पण रामा माझ्या सोबत कायम असं तो त्याला एकदा विचारून पहा काही माहीत आहे का? काल पासून फिरकला नाही इकडं."

"हा, कुठे भेटेल तो?" मला आता रामा ला भेटण्याची घाई झाली

“हा वाडी मधी कोणाला पण विचार पार त्याच्या घरी नेऊन सोडतील.”

कोणी तरी मला रास्ता दाखवत त्याच्या घरा पर्यंत आणून सोडलं, छोटसं झोपडीवजा घर होतं. सारवलेलं अंगण अंगणात कोंबड्या पळत होत्या. समोर मस्त फुलझाडं लावून ठेवलेली होती. एकंदरीत प्रसन्न वातावरण होतं तिथलं. अंगांत मस्त फुललेली तुळस आणि मातीने लिंपलेल्या भिंती असूनही स्वच्छ आणि सुंदर अंगण घराला घरपण देत होतं.

“कोणी आहे का घरी?” मी दोन तीन आवाज दिल्यावर एक म्हातारी बाहेर आली. मला पाहिल्यावर तिच्या चेहऱ्यावर एक ओळखीचं हसु आलं, मला बस मध्ये भेटलेली तीच म्हातारी होती ती. मला ही तिला पाहून बरं वाटलं, गाव किती छान असं त ना, प्रत्येक गोष्टीला आपल्यात सामावून घेतं. शहरात चारदा समोरून गेले तरी मख्ख चेहऱ्याने लोक पाहत राहतात. कोण कुठे दूर दूर पर्यंत ओळख नसलेली ही म्हातारी किती सुंदर ओळखीचं हसू आलं तिच्या चेहर्यावर. फक्त अर्धा तास प्रवासात सोबती होतो आम्ही. मला आत येण्याची खूण करून ती मला आत घेऊन गेली. घरात मोजक्याच सामानाची थाटणी होती पण अगंदी पद्धतशीर मांडणी आणि स्वच्छ घर मला जास्तच आवडलं.

“रामा कुठे आहे?”

मी विचारलेला प्रश्न तिला कळला असावा, पण तिने आधी चहा बनवते अशी खून केली, समोर चहाचा कप ठेऊन तिने खुणेने सांगितलं तो बाहेर गेला असावा बहुतेक.

“कधी येणार?”

तिने काही कल्पना नाही अशी मान हलवली. एक शेवटची आशा होती. पुढे काय करावं? अशा विचारांत हरवलेच होते की बाहेरून कोणीतरी आल्याची चाहूल लागली. तो रामाच होता. तो आल्या  आल्या आल्या त्याला समोर बसवून मी ते पत्र आणी तो फोटो दाखवला. तो मात्र मला भेटलेला पहिला व्यक्ती होता ज्याने फोटोतल्या व्यक्तीला ओळखलं, “हा मॅडम मी वळकतो की यांना. येतात कधी  तरी गावाला, श्रीयश साहेब नाव आहे त्यांचं.” रामाच्या तोंडून ते ऐकुन फार बरं वाटलं.

“आता कुठं भेटेल तो सांगता येईल का?”

“न्हाई बा ते नाही सांगता यायचं, तुम्हाला पत्र लिहिलं ते मलाच टाकायला लावलं होतं तव्हाच त्याची काही टिपणं तुम्हाला भेटली नाई. गेल्या वर्षी ते सहा एक महिने गावात हुत पण कोणाला जास्त काही माहीत नव्हतं अन आता माहीत बी होणार नाही.”

“म्हणजे?” मी आश्चर्यानं विचारलं.

“म्हणजे आता ते कायमचे सोडून गेले गावाला, गावात त्यांच्या मालकीचा एक वाडा हाये कधी तरी येत असंतात पण आता येणं होतं नाही. अन तुम्ही गाववाले ना जुना फोटो दाखवला असं लं त्यांनी ओळखलं बी नसलं कुणी.”

“बरं, त्याचा काही पत्ता देऊ शकाल का? पत्ता तर नाई पण मागल्या येळी एक नंबरं मात्र दिला होता, आता इथं रेंजचं नाई तर फोन कसा करणार ना. कुठं ठेवलाय?” त्यांनी बराच वेळ शोधाशोध केल्यावर त्याने एक कागद माझ्या हातात दिला. मोबाईल नंबरं त्यावर लिहिलेला होता.

मी लगेचच त्यांचा निरोप घेऊन तिथून निघाले. लवकरात लवकर मला तिथून बाहेर निघून ‘लोढू’ला फोन करायचा होता. गाव सोडून काही अंतरावर आल्यावर माझ्या मोबाइलला नेटवर्क दिसायला लागलं. घाईघाईनेच मी तो नंबरं फोन मध्ये डायल केला.

“आपण ज्या नंबरं वर संपर्क साधू इच्छित तो आता बंद आहे.” यार खरंच, हातातला मोबाइल कुठे तरी फेकून द्यावा असं मला वाटलं.

बॅग उचली आणि रिटर्न ची बस पकडली. दुपारी स्टेशन वर शांत बसले कारण आता डोक्याचा वाजलेला तशा शांत करणं गरजेचं होतं जरा शॉर्ट टेम्पर असं ल्याने चीडचीड झाली की उगाच

कोणावर तरी त्याचा भडका उडू नये याची काळजी. बाकी काही नाही. स्टेशन वर रोजच्या सारखीच वर्दळ होती. माझी ट्रेन लागायला अजून अर्धा तास वेळ होता. पुन्हा एकदा प्रयत्न करावा म्हणून मी मोबाईल खोलून त्या नंबरं बरं कॉल लावला. पुन्हा तेच, तो नंबरं बंद होता. शीट यार, काही फायदा नाही, रिकाम्या हाताने परत जावं लागतं आहे म्हणून मला जास्त चीड येत होती.

विचार करत करत मी स्वतःमध्ये काहीशी हरवून गेले होते. प्लॅटफॉर्मवर वेटींग चेअरवर पाय पसरून बसले होते. डावा हात शेजारच्या माझ्या सॅक वर ठेऊन हातावर डोकं टेकवून मी शांततेत विचार करी बसले होते. म्हणजे फक्त वरून तशी शांत दिसत होते पण आतून येतील तेवढ्या शिव्या स्वतःवर झाडून झाल्या होत्या. एवढ्या लांब येऊन काही फायदा झाला नाही. कोणीतरी घाई घाईत माझ्या समोरून जाताना मी पसरून बसलेली असंल्याने पायाला पाय अडकून तोंडावर आपटलं.अरेर!! कुणीतरी धडपडलं होतं, समोर कळवळत पडलं होतं, "साला कोण तडमडलाय दिसत नाही का?" ते बिचारं गुडघ्याला लागलं म्हणून कासावीस होऊन गुडघा हातात धरून उठायला लागलं, डोळ्या वरचा चष्मा सरळ करत तो उठला, मी जागेवरून उठून त्याला बसायला जागा दिली, पडलेल्या जागेवरून उठताना त्याने टक लावून माझ्या कडे बघायला सुरवात ती नजर किती तरी वेळ तशीच ठेऊन तो मला नेहाळत होता. "ओ

मिस्टर इथे येऊन तडमडलाय म्हणून बसायला जागा दिली. आता जास्तीच गणित वाढवू नका. नाहीतर कानाखाली ही तितकीच जोरात खेचता येते. प्रत्यक्षात पाहायचं असेल तर दाखवू का?" चढ्या आवाजातला दम ऐकून तो मात्र अचानक हसायला लागला.

"सुरे दम दयायची सवय अजून काही सुटली नाही तुझी."

मी जरा चमकून त्याच्याकडं पाहत राहिले. "लोढू?"

हा लोढू तर नाही ना? पण छे हा काय असंणार. लोढू तर चांगला दीडशे किलोचा मांसाचा गोळा होता. हा तर एकदम फिट आणि फाईन दिसतोय.

"क.. काय म्हणालास?" मी पुन्हा त्याला उलट प्रश्न केला.

तो हसून म्हणाला, "अगं सुरे, तुझी अजून ती सवय गेली नाही का? खादाड कुठली. आख्ख्या दहावीचं पूर्ण वर्ष माझा डब्बा खदडला तरी माझ्यावरच हुशारक्या दाखवते. बघ ना, मी तुला पहिल्या नजरेत ओळखलं तरी तुला मी कोण ते आठवेना.

"ओह माय गॉड, साजूक तू?"

तो त्याचा दुखरा पाय सोडून उभा राहिला, "नालायक कुठे होतंस इतके दिवस. मी तुला शोधण्याचा किती प्रयत्न केला माहितीय आणि तू एकदा ही तुला वाटलं नाही की सूरी ला एकदा भेटावं. तू जरी ॲक्टिव्ह नसला तरी माझं नाव गाव शोधून काढणं

तुला जास्त जड गेलं नसत.” मी पुन्हा चिडले होते पण या वेळी मला त्याच्यावर राग काढणं जमेना.

“अगं हो. किती चिडशील?” तो पुन्हा हसला, त्याला गालाला खळी पडते हे माझ्या आता लक्षात आलं. तेव्हा ते त्याच्या गोबऱ्या गाला मुळे लक्षात येत नसावं.

“अगं सुरे, मी ही खुपदा तुझी आठवण काढली. पण मधल्या काळात खूप गोष्टी घडून गेल्या त्यातून बाहेर यायला वेळच मिळाला नाही.” पण तू अशी अचानक भेटशील असं  वाटलं नव्हतं किती छान योगायोग म्हणावा.

“योगायोग म्हणण्यापेक्षा देवालाच माझी कीव आली असं म्हण ना.”

“म्हणजे?”

“म्हणजे मी तुला शोधत तू पाठवलेल्या पत्त्यावर पोहोचले.”

“ओह माय गॉड. केवळ मला भेटण्यासाठी तू एवढे कष्ट घेतले? थँक्स टू गॉड की आपली भेट झाली.”

“नशिबाने रामू मला भेटला आणि त्याने तुझ्या बद्दल सांगितलं.”

“तुला शोधतच स्टेशन कडे आलो.”

“पण असा भेटशील असं वाटलं नव्हतं.” मी हसून म्हटलं.

“बरं ते सोड, किती बदलला रे साजूक तू. दीडशे किलो वरून साठ सत्तर वर कसा आला? एवढा change? भारीच हँडसम दिसायला लागला रे. ही जादू कशी झाली?”

“हा मी तर झालो बारीक थोडी मेहनत घेऊन, पण तु मात्र तोळाभर सुद्धा बदलू दिल नाही स्वतःला.”

“ओये मी किती improvement केली माहितीय स्वतःत. मी आता अजिबात कोणावर चिडत नाही.”

“हा असुद्या पाहिलं ते मघाशीच.”

तो हसला तस मला त्याच आधीच ते हसू आठवलं अगंदी तसच, किती निरागसता होती त्यात. तो हसायला लागला लहान बाळा सारखा वाटायचा.

“चल आता तू एवढ्या लांब आलीच आहेस तर तुला माझं गाव दाखवतो. सगळं फिरून घेऊ मग परत जा. आपण काही वेळ का होईना पुन्हा ते आयुष्य जगू निरागस आणि खेळकर, त्याने बोलताना मोठा उश्वास सोडला.” का माहीत नाही? पण त्या सोडलेला उश्वासा मागे खूप काही गोष्टी दडून ठेऊन आहे असं मला वाटलं.

“मी ज्या गावामध्ये गेले होते तेच तुझं गाव ना? ते तर मी पाहिलं आहे.”

“हो पण मी जे दाखवणारे ते नसशील पाहिलं. चल तुला दाखवतो खूप सुंदर निसर्ग आहे, सगळं टेंशन विसरशील.”

स्टेशन मागे सुटलो. आम्ही दोघे पुन्हा निघालो नव्या दिशेला. सोबत चालताना मी त्याला काहीशी न्याहाळत होते. खरंतर दहावीत असंताना माझी उंची फार काही नव्हती, म्हणून तो मला जास्त उंच वाटायचा. बारावीत आल्यावर उंची वाढली. तेव्हा तर compare करायला तो सोबत नव्हता. आता मी त्याच्या खांद्याला लागत होते, आधीच्या जाड आणि बेढब लोढुच रूपांतर आता एक हँडसम आणि डॅशिंग युवकात झालं होतं. व्यायामही त्याच्या पिळदार यष्टी मधून झळकत होता. कसा एवढा बदल झाला? मी विचार करत होते. छान कोरून केली दाढी, डोळयावरचा सेन्सिअर लुक देणारा चष्मा, लोढुची जशी नव्याने ओळख झाली होती. तो माझी ट्रॅव्हलर बॅग स्वतःच्या खांद्यावर घेऊन माझ्या पुढे चालत होता, मी मात्र स्वातःचाच विचारात त्याच्या मागे निघाले होते.

“अरे माझं डोकं फुटेल आता काय चाललंय हे सगळं? तू इथे या ओसाड गावात काय करतोय? तू तर तुझ्या गावी गेला होतास?

एवढा बदलास? एवढे दिवस तर जसा गायबच होतास, कुठे होतास एवढे दिवस? काय केलं? काही सांगशील का?"

"आरे हो हो, सांगतो. सगळं सांगतो." तो माझ्या एकापाठोपाठ चाललेलेल्या प्रश्नांच्या भडीमराला थांबवत म्हणाला.

अगं मी शिक्षण पुर्ण केलं, वडिलांच्या नावावरची जमीन विकली थोडीशी गुंतवणूक करून आता बर चाललंय माझं.

"काही नाही वाटलं निसर्ग जवळून अनुभवावा म्हणून इथे आलो. फार प्रसन्न वाटत इकडे आलं की आणि तू ही आवर्जून पहा इथला निसर्ग पाहशील तर प्रेमात पडलशील."

त्याच्या जीप मध्ये बसून आम्ही गावाच्या दिशेने निघालो. गावाच्या बाहेर साधारण एक किलोमीटर अंतरावर येऊन गाडी थांबली. समोर आलिशान वाडा होता. जास्त रहदारी नसावी म्हणून जास्त काही चकाचक वाटला नाही. आत भरपूर जागा होती. वापरात नसल्याने धूळ जळमटे झालेले दिसत होते. पण तरी त्याची सुंदरता लपत नव्हती. मधोमध मोठी जागा होती, उंच इमारत सुदंर होती, लाकडी बांधकाम, दगडी रचना आकर्षून घेत होती.

"बघतेयस ना? आवडला का? माझ्या आजोबांच्या वडिलांनी खास बनवून घेतलेला हा वाडा, जुना आहे खूप, सध्या विकायचं चाललंय. येत असं तो अधून मधून छान वाटत गाव, तसही माझ्या

शिवाय याला कोणी वारस नाही. पण मला हा विकायची इच्छा होतं नाही.''

''ये, अगं उभी काय आहे? ये इकडे तुला खोली दाखवतो तुझी. इथे मात्र ऐसपैस रूम्स आहेत पूर्ण वाड्यात अश्या नऊ खोल्या आहेत. चलचल आपल्याला अजून खूप गोष्टी बघायच्या आहेत.''

त्याने माझी बॅग घेऊन आत येण्याची खूण करत तो पुढे निघाला.

''सावकाश ये. पडशील. पायऱ्या मोठ्या आहेत पण लाकडी असंल्याने पाय सरकतो. अगं मी एकदा सोडून दोनदा पडलो आहे तिथून.'' तो बोलत होता तसा तसा त्याचा आवाज वाड्यात घुमत होता.

''सुरे आठवतंय का आपण किती माजा करायचो तू नुसत्याच खोड्या काढायची आणि मी मात्र नुसते सगळ्यांना सॉरी बोलण्यात दिवस घालवायचो. बोलत बोलत त्याने त्या खोलीची सगळी धूळ झटकली, अगं आणि आठवतंय तुला ते एक मुलाने दहावीत असं ताना प्रापोस केला होता. तू त्याला काय चोपला होतं. बिचारा. पुन्हा कधी कोणाला प्रापोस करण्याची डेअरिंग नसेल झाली त्याची आयुष्यात.'' किती तरी वेळ तो एकटा बाबडत होता. खटकन

आवाज झाला आणि वाऱ्याची एक मंद झुळूक खोलीत आली. त्याने खोलीतल्या दोन्ही खिडक्या उघडल्या. सगळी खोली प्रकाशने भरून गेली. इतका वेळ न जाणे कुठे हरवून गेले होते. खटकन जाग आल्या सारख झालं.

"अरे, वाडा तर खूप छान आहे रे. मला तर इकडेच राहायला यावं वाटतय. किती सुंदर दृश्य दिसत इथून बाहेरच. छान माडाची झाड आणि शेती दिसत होती. आंब्याच्या बागा ही दिसत होत्या लांब लांब पर्यंत बागायती शेती दिसत होती. सुदंर वाटत होतं, जवळ नदी असेल ना?"

"हो तुला कसं माहीत? नदी आहे."

"खूप छान नदी आहे. आपण जाऊ तिकडे. तुला शहरातल्या गटारी नाले आणि ती वास सोडणारी नदी एवढंच माहीत असेल. चल तुला दाखवतो, गावाचं सौंदर्य."

तो बाहेर गेल्यावर मी शांत होऊन खिडकीतून बाहेर पाहत होते. किती सुंदर दृश्य होतं ते. मंद वाऱ्याची झुळूक चेहऱ्यावर येत होती. संध्याकाळची वेळ झाली होती त्यामुळे हलकी थंडी सुटलेली. अंगावर बारीक काटा आला. रोजचा शहरातला उकाडा तेवढा मला माहित होता. त्यावर उपाय म्हणून AC लावून थंडी

अनुभवणे आणि खऱ्या खुऱ्या निसर्गाचा अनुभव घेणे किती फरक असं तो तेव्हा पहिल्यांदाच वाटलं.

“ये सुरे, आवर लवकर.” हे गाव आहे इथे लोक अंधार पडायच्या आत घरी येतात. शहर नाही रात्रभर फिरायला. चल लवकर. तो बाहेरूनच ओरडला.

“आले रे जाड्या.” मला नेहमीचं त्याच नाव आठवलं. मी स्वताशीच हसले. जाड्या, हा जाड्या कसंला? एवढा हँडसम झालाय मस्त. तसा आता charming दिसतो ना. मी फ्रेश होता होता स्वताशीच विचार करत होते. आवरून बाहेर आले. “ओये लोढू चलो. आम्ही तयार आहोतं.” मी हसत त्याला आवाज दिला.

“हो हो आलोच.” तो वाड्याच्या दुसऱ्या मजल्यावर असंलेल्या लाकडी पायऱ्यावरून धाड धाड करत पळत आला. पळताना एक चपळाई दिसत होती त्याच्यात. उंच पुरा आणि पिळदार शरीर. मी क्षणभर पाहतच राहिले.

“अरे यार, असं काय पाहतेय? मी दचकून लगेच दुसरीकडे नजर वळवली.

मी स्वताशीच हसले.

आम्ही दोघे चालत चालत कुठे तरी निघालो होतो. मी घातलेलं शर्ट आणि शॉर्ट पॅन्ट गावाकडे नवीन वाटत होती. कारण

आता थोडे थोडे का होईना मला ओकवर्ड वाटायला लागलं. शेतात काम करणारे काही लोक मात्र मला विचित्र प्राण्याकडे पाहावं आशा नजरेने बघत होते. माझा जरा मूर्खपणाच झाला असं मला स्वतःला वाटलं. कारण मघाशी थोडी थंडी लागत होती. आता तर मधून मधून अंगावर काटा येत होता आणि त्यात अंगभर चावणारे मच्छर. वाह काय मस्त ना. तरी सूर्य मावळायला अजून वेळ होता. तो सोबत चालला होता पण आमच्यात काहीच संभाषण होतं नव्हते. कारण मी ते सौंदर्य डोळ्यात टिपून घेण्यात व्यस्त होते.

हलकं मावळतानाचं कोवळं लाल-पिवळं ऊन पाण्यावर चमकत होतं. स्वच्छ पाणी त्यात वर खाली पोहणारे मासे सुद्धा स्पष्ट दिसत होते. नदी तशी छोटीशीच पण वरून संध्याकाळच्या वेळी उडून जाणारे पक्षांचे थवे मी कितीतरी दिवसातून पाहत होते. नदीचा झुळझुळ वाहतानाचा आवाज कानात साठवत होते. हलका सुटलेला वारा चमकणारे लाल ऊन त्याच्या चेहऱ्यावर पडलं होतं. तो काहीतरी विचार करत असावा. माहीत नाही का, आधी कधी त्याच्या बद्दल मला असं वाटलं नव्हतं पण आज त्याला पाहून मला आता काहीतरी वेगळंच वाटत होतं.

“येह वेडाबाई प्रेमात बिमात पडशील हा. परत अवडघड होईल.” त्याने हसून माझ्या कडे मान फिरवली. मी बराच वेळ त्याच्याकडे पाहतेय त्याच्या लक्षात आलं असावं बहुतेक. मला स्वातःचाच हसू आलं. चेहऱ्यावर आलेली लाज त्याला समजू नये म्हणून विषय बदलला.

“काय रे साजूक, एवढा बदलास. मस्त बॉडी बनवलीस एवढे दिवस होतास कुठे तू? काही गर्लफ्रेंड वगैरे बनवली का नाही? काही पत्ता नाही साधा एक फोन पण नाही. तुला नव्हते जमत तर निदान मला बोलायचं मी आले असं ते तुला भेटायला.”

“अरे वेळच मिळाला नाही कामाच्या गडबडीत. बाबा तर लहान असतानाच गेले आणि आई ही दोन वर्षांपूर्वी गेली.”

“ओह सॉरी.”

“इट्स OK. बरं ते सोड तुझं सांग.”

“माझं, माझं काही नाही शिक्षण पूर्ण केलं नोकरी पडकली बस तेव्हढ्यातच खुश. या दरम्यान तुझी खूपदा आठवण आली. तुला शोधायचा प्रयत्न ही केला पण तू काही सापडला नाही. नशीब त्या पत्रा मुळे मला तुझा पत्ता मिळाला.”

बराच वेळ दोघे गप्पा मारत होतो. छान वाटत होतं. पण आता बोचऱ्या थंडीने अंगावर जो काटा चढला होता तो जाता जात नव्हता. अरे घरी चल, तू कुडकुडायला लागली पार. आम्ही लगेचच मागे फिरलो. "कळलं ना हे असे तोडके कपडे इकडे का चालत नाही ते."

मी आल्या आल्या ब्लँकेट मध्ये स्वतःला गुरफटून घेतलं.

"हे घे, गरमागरम चहा." त्याने माझ्या समोर वाफाळता कप ठेवला.

"वाह छानच. हेच मिस करत होते. हा तर मग आपण काय बोलत होतो मघाशी? हा एखादी पोरगी पटली का नाही तुला? मला तर वाटते एवढ्यात बरंच काही झालं असं ले."

"तू हा प्रश्न दुसऱ्यांदा विचारला आहेस." तो चहाचा घोट घेत म्हणाला.

"हा... हा..."

मी शांत झालेली पाहून त्यानेच विषय चालू केला.

"होती एक."

"मग?"

"पण काय होती म्हंटल्यावर. तो भूतकाळ झाला ना."

“मला ती आवडायची. पण तिला मी आवडायचो का नाही ते माहीत नाही.”

“ओह अच्छा. म्हणजे भूतकाळ होता तर.”

“ओके.” माझा चेहरा उजळला.!

“आणि तुझं?”

“माझं? मी तर एवढी खडूस माझ्याशी कोण पटवून घेणार?”

“हा ते तर आहेच. म्हणत तो ही हसला.”

“बरं, थोड्या वेळात रामा जेवण घेऊन येईल. आपण जेवून घेऊ.”

“थकली असशील जेवून घे. मग काय गप्पाच मारायच्या आहेत. मी जरा बाहेर जाऊन येतो.” असं म्हणून तो बाहेर गेला.

रामा जेवण ठेऊन लगबगीने निघून ही गेला. मिणमिणत्या दिव्याच्या उजेडात मी जेवण केलं. पण मोबाइललाला रेंज नाही आणि त्यात हा ही बाहेर गेला होता. त्या वातावरणात जरा भीतीची लहर उमटली.

“लोढू, तू बाहेर आहेस का?” फक्त रातकिडे किरकिरण्याचा आवाज येत होता. थकलेली असूनही मला झोप

येईना म्हणून  प्रवासात घेतलेलं पुस्तक वाचायला घेतलं. पण पुस्तकात माझं लक्ष लागेना. रातकिड्यांची कीरकिर आणि दूरवर कुठेतरी कुत्रे भुंकत होते. रम्य वाटणार सगळं अचानक भयाण वाटायला लागलं. बाहेर काहीतरी आवाज झाला तस काळजात धस्स झालं.

"कोणी आहे का बाहेर?"

कुठलीच प्रतिक्रिया नाही. काय यार हा कुठे गेला.? किती काळोख आहे हा? एवढी मोठी खोली फक्त आवाज घुमतो इथे. मधून मधून वाटायला लागलं कुणी पाहतय आपल्याकडे. तोंडावर ब्लँकेट घेऊन देवाचं नाव घ्यायला सुरवात केली.

"कुठं गेला? येउ दे आता चांगला कोलते धरून. ओह गॉड. लवकर ये रे." मनात नाना प्रकारच्या शंका यायला लागल्या, कोल्हेकुई ऐकायला अली तस पुन्हा धस्स झालं. खोलीचा दरवाजा पॅक केलेला होता तरीही मनात शंका यायला लागल्या. बाहेर कोणी लपले असेल तर. कोणी अचानक आलं तर काय करायचं? मी इथं आहे कोणाला माहीत पण नाही काही बरं वाईट झालं तर कोणाला माहीत सुद्धा होणार नाही. बापरे! काय काय विचार येऊन जातात डोक्यात.

"सुरे," बाहेरून आवाज आला.

“तू आत ये आधी.” मी काहीशा रागाने म्हणाले.

तोंडाला येईल तशा शिव्या घातल्यावर मी विचारलं, “कुठे तडमडला होता मला एकटीला या भूत बंगल्यात सोडून?”

“ओह माफ करा मॅडम. मला काय माहीत एवढी घाबरशील म्हणून.”

“उद्याच निघते मी परत जायला.”

“ओह सुरे चिडतेस काय? नाही पुन्हा असं नाही करणार. चूक झाली. घे समजून.”

“तस मी तुझंच काम करायला गेलो होतो.”

“माझं काम?”

“हो, उद्या कळेल तुला.” त्याने स्मित केले. “बरं, आता तू झोप बिंनधास्त मी आहे काही लागलं तर हाक मार.”

“तू जाऊ नको कुठे. मी त्याचा हात घट्ट पकडला.”

“बरं झोपतो इथेच खाली. घाबरू नको मी आहे आणि इथे तसली काही भीती नाही.”

तो आल्यावर मला जरा शांतता वाटली, तो बेडच्या बाजूलाच शांतपणे पहुडला होता. मी एक कुशीवर होऊन त्याला

न्याहाळत होते. सोबत डोक्यात बरेच विचार चालू होते. नकळत डोळा लागला.

सकाळचा अंगाला झोंबणारा थंडगार वरा अंगावर घेत खिडकीतून बाहेर पाहत होते. त्या कोवळया उन्हाची तिरीप अंगावर पडत होती जणू परसातली झाडं मंद वाऱ्या बरोबरं त्या कोवळया उन्हाशी मसलत करत होती. पक्षी किलकीलाट करत इकडून तिकडे बागडत होते. माझ्या अंगावरची साडी त्या मंद वाऱ्या बरोबरं फडफडत होती. वाऱ्यावर उडणारे केस सांभाळताना उडणारी तारांबळ कोणी तरी न्याहाळत होतं, वरवर उडणारा तो पदर, त्या थंड वाऱ्यात मानेवर उष्ण श्वास जाणवला. हवा हवासा.
“सूर्वी.”

त्या आवाजाने सगळं काही स्तब्ध झालं. मागून हळूहळू घट्ट होणारी ती उबदार मिठी आणि हळू हळू कमरेवर फिरणारा हात. त्याने जणू घट्ट बांधून टाकले. किलबिलणारे ते पक्षी, मंद डुलणारी झाडं जणू काही क्षण स्तब्ध झाली, हळूहळू घट्ट होणारी मिठी त्यात मी विरघळून जाते असं वाटायला लागलं. मानेवर झालेला ओठांचा हलक्या स्पर्शानं मी शहारले, त्याच गरम मिठीत एक नवा संवाद चालू झाला. श्वासांची अस्वस्थता जाणवायला लागली की

अचानक ती मिठी सैल झाली त्या जागी काळोख आणि एक भयंकर आवाजाने थरकाप उडाला.

रात्री कुत्रे ओरडण्याचा आवाज आला तशी मी दचकून जागी झाले. ते भयानक केकाटने अंगावर शहारे आले त्या आवाजाने मी दचकून जागी झाले.

“लोढू, कुठेयस?” मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाशात त्याच्या जागेकडे पाहिलं. तो तिथे नव्हता. ओह गॉड, पुन्हा भीतीने पोटात गोळा आला. हे काय होतंय? कुठे जातो कुठे? हा असा अधून मधून एकतर किती भयानक आहे ही जागा. मी पुन्हा त्याला चार पाच हाका मारून पहिल्या पण काही फरक पडला नाही. भीतीने घाम फुटला मधून मधून कोल्ह्यांची कोल्हेकुई ऐकू येत होती. मधूनच कुठूनतरी चिटपाखरू चिरकण्याचा आवाज कानांवर पडत होता. मी चादर घेऊन झोपण्याचा प्रयत्न केला पण त्या भयानक वातावरणात झोप जणू कुठे गायबच झाली. मनात विचार आला उद्याच निघावं माघारी.

पडल्या पडल्या वाटत होतं की बाहेर कोणतरी आहे. कोणीतरी कुजबुजल्या सारखा भास होतं होता कदाचित तो असेल बाहेर बघून यावं का. तो असं ला तर त्याच्या सोबत थांबेल इथे तर मी भीतीनेच मरेन. थोडीशी हिम्मत करून मी त्या मोठ्याश्या

दिवाणावरून उठले. लाकडी दरवाजा हळूच सारकरवून त्याच्या फटीतून बाहेर पाहू लागले. बाहेर काळाकुट्ट अंधार पसरला होता. बाहेरचं काहीच नजरेस पडत नव्हतं, दूरवर अंगणात काहीसा उजेड दिसला. छोटीशी शेकोटी दिसत होती. लोढू, लोढू आहे का तो?

काहीतरी वेगळच वाटलं याचं असं अचानक भेटणं. या भयानक वाड्यात घेऊन येणं आणि अचानक असं मधून मधून गायब होणं, काहीस वेगळं वाटायला लागलं. याच्या मालकीचं घर तेही पूर्वजांनी बांधलेलं कसं? याचं असं  बदलणं अचानक भेटणं सगळं कसं कोड्यात टाकणार होतं. माझ्या मनात जर गोंधळ व्हायला लागला सगळ्या गोष्टींचा. एवढ्या रात्री हा बाहेर काय करत असावा? मनात शंकेची पाल चुकचुकली.

सकाळी जाग आली ती त्याच्या आवाजाने, “ओ मॅडम उठा आता. सूर्य डोक्यावर आला.” त्याने माझ्या समोर वाफाळत्या चहाचा कप ठेवला. त्याला पाहून मी काहीशी दचकले. “अगं,असं काय भूत पहिल्या सारख दचकतेय? काहीतरी विचित्र स्वप्न पाहिलं वाटतं.

मी डोक्याला हात लावला. भयंकर डोकं दुखत होतं, “हो रे स्वप्नच पडलं होतं बहुतेक. विचित्र स्वप्न.”

“बरं बरं, असु दे , चल आवर लवकर आपण बाहेर जाणार आहोतं. तुला गाव दाखवतो अजून खूप ठिकाणं तुला दाखवायची आहेत.”

मी अरश्या समोर उभी राहून आवरतच होते की तो तयार होऊन आला. साधी खाकी पॅन्ट आणि दंडावर घट्ट चिकटलेला t shirt त्याच पिळदार शरीर त्या पोशाखात अजून सुंदर दिसत होतं. ओह… आणि क्षणार्धात नजर खिळली. लोढु एवढा आकर्षक कधी पासून झाला. माझं चंचल मन भिरभिरायला लागलं. क्षणभर वाटलं पळत जाऊन झटकन एक झप्पी मारावी. पण नंतर स्वतःला आवरलं. असं असभ्य वर्तन करणे बरे नाही. त्याला नाही आवडले तर. बरं वाटत नाही ते.

आज मात्र बाहेर जायला जशी स्वप्नात दिसत होती तशीच साडी नेसली. फिक्कट गुलाबी. बॅग भरताना मी काय विचाराने ती साडी आपल्या सोबत घेतलेली मला लक्षात येत नव्हतं, पण अचानकच सगळ्या कापड्यांकडे पाहून त्यात ती साडीच सगळ्यात सुंदर दिसायला लागली. “अरे एक ना आपण आज फोटो काढू ना मस्त. काल लक्षात नाही राहील. गावात नेटवर्क जरी नसलं तरी फोटो काढून ठेवायला हवे लेटपोस्ट अपलोड करता येतील. मी रात्रीच फोन चार्जिंगला लावून ठेवला होता.”

"बरं बरं, घे तुला काय घ्यायचं ते. मी बाहेर वाट बघतोय." तो बाहेर गेल्यावर मी पुन्हा एकदा आरशात स्वतःवर नजर फिरवली. एव्हढीही काही वाईट नाही हा मी. हा तर साधा बघत पण नाही निट माझ्या कडे. नाहीतरी म्हणा मुलींचा हा प्रॉब्लेमच असं तो मुलाने बघितले तरी प्रॉब्लेम आणि नाही बघितले तरी प्रॉब्लेम. मी स्वतःशीच हसले.

"हा चल निघुया," मी बाहेर येऊन त्याला निघण्याची खूण केली. पायी चालत आम्ही कच्च्या रस्त्याने पुढे निघालो. सुंदर माडाच्या रांगा पसरल्या होत्या. पलीकडून आमराईच सुंदर दर्शन होतं होतं. सकाळची गुलाबी थंडी अजून ही ओसरली नव्हती. हलकं हलकं धुकं रस्त्यावर पसरलं होतं. कोवळं ऊन उबदार वाटत होतं. लांबून मोरांच्या म्याव म्यावचा आवाज. त्यात किलकीलणारी पाखरं वातावरण प्रसन्न करत होती. सुंदर वाटत होतं कसं सगळं.

"सुरे ऐकतेस का? तुला आठवत का गं? आपण सोबत जेवायला बसलो तर तू माझा डब्बा आणि सोबत तुझा डब्बा सुद्धा संपवायची. तरी एवढी बारीक कशी दिसतेस ग?"

"म्हणजे फक्त बारीकच दिसते, साडी कशी आहे सांगितलं नाही?" मी त्याच्या चेहऱ्यावरचे भाव न्याहाळत प्रश्न केला.

"साडी ही छान आहे." त्याने तोळ्यावर मोजून देतात तस कौतुक केलं त्याचा मात्र मला रागच आला. तरी मी तो काही दाखवला नाही.

"अरे माझं सोड तू ही जादू कशी केली. ते सांग मला अजून ही आश्चर्य वाटतय की तूच आहेस म्हणून, एवढा कसा बदलला?" मी हसून त्याच्या कडे पाहिलं.

"तीच तर गोष्ट जिने मला खरं रूप दाखवलं. तिरस्काराचं. लोकांना सुंदरता एवढी का भावते ग? सतत मी अपमान सहन करत आलो सतत चे टोमणे. मी म्हणजे लोकांना हसण्याच आणि थट्टेच हक्काचं ठिकाण होतो. प्रत्येक जण मला हसून पुढे निघायचा. मी जरी चेहऱ्यावर हसू आणत असंलो तरी मनातून खुप अस्वस्थ व्हायचो. मला ही काही स्वप्न होती त्या वयातल्या अल्लड भावना होत्या पण आपल्याकडे लक्ष लोक तेव्हा देतात जेव्हा आपण एकतर सुंदर दिसू. नाहीतर अतिशय कुरूप माझी कॅटेगरी मला समजली होती. एक जाडा आणि लठ्ठ मुलगा या पलीकडे माझी ओळख ही नव्हती."

त्याच्या मनातली घुसमट त्याच्या शब्दांतून जाणवत होती. मी ही त्याच थट्टा करणाऱ्या लोकांमधलीच एक होते. क्षणभर मला काय बोलावे ते ही सुचेना.

"माहितीय माझं ही एका मुलीवर प्रेम होतं, खुप आवडायची मला ती. कधी बोलू शकलो नाही. कारण ती ही मला माझ्या लठ्ठपणा मुळेच ओळखत होती. यापलीकडे काहीच ओळख नव्हती माझी. एवढा वाईट तर नव्हतो मी?"

काही वेळ असाच शांततेत गेला. मीही हसणाऱ्यांमधलीच एक होते. स्वतःचच वाईट वाटलं मला त्या वेळी. पण काश ती मुलगी मी असं ते. असं क्षणभर वाटलं.

चालत आम्ही दूरवर एक टेकडीकडे निघालो. तिथून गावच एकंदर दृश्य दिसत होतं. दूरवर पसरलेल्या माडाच्या बागा, आमराई, चिंचेची बनं आणि मोर, कोकिळा, पक्षी यांचा संमिश्र चिवचिवाट ऐकायला किती मोहक वाटत होतं. मन अगंदी असं मोरपिसा सारख हलकं झालं होतं.

"चला मॅडम आता मस्त जेवणावर ताव मारू आपण." थोडं खाली उतरून गेल्यावर एका जागी काही तरी छान अशी रचना दिसत होती. छान पसरलेलं धुकं त्या कच्च्या पाऊल वाटां आणि सुंदर लाकडी टेबल. बसायला दोन खुर्च्या, हिरवा लांबवर पसरलेला हिरवा बगीचा आणि तिथून दिसणार गावाचं सुंदर रूप. मला स्वतःच्या डोळ्यावर विश्वास बसत नव्हता. एवढं ही सुंदर

काही असतं. त्याने अदबीने 'मॅडम बसा' असं म्हणत खुर्ची सरकवली. मला तर जणू स्वर्गात आल्याचा भास होतं होता.

"लोढू... तू केलं हे सगळं?" मी भीरभिरल्या नजरेने ते सगळं नजरेत साठून घेत होते.

"जास्त नाही गं. इथे मुळातच सुदंर देणगी दिली आहे गावाला निसर्गाने. फक्त टेबल तेवढा जमवला. संध्याकाळी तुझं हेच काम करायला आलेलो."

"ओह लोढू. तू किती करतोस माझ्यासाठी. जेवढ्या प्रेमाने मी त्याच्याकडे पाहत होते तशाच नजरेने तो ही पाहत असावा असं मला वाटलं. पण ते क्षणभरच. रामा गरमागरम जेवण घेऊन हजर होता. पुन्हा एकदा असं  वाटलं की कितीतरी दिवसांनी मी असं पोटभर जेवतेय.

दुपारी जेवण झाल्यावर ही आम्ही बऱ्याच जागा पहिल्या. खूपच सुंदर निसर्ग अनुभवत होते मी. संध्याकाळी आम्ही परत यायला निघालो. दिवसभरात माझी मात्र अथक बडबड चालू होती. पण तो मात्र शांत... मला फारस काही स्पष्टपणे तो बोलला नसला तरी त्याच्या मनात काहीतरी घुसमट चालु आहे एवढं माझ्या नक्कीच लक्षात आलं होतं.

“पण मी काय इथे कायमची राहणार नाही. निदान काही वेळ तरी आनंदात जाऊदे आणि प्लिज जे असेल ते बोलायच आणि मोकळं व्हायचं, रिलॅक्स राहायचं तर तू हा असा घुम्या सारख राहतो. तुला हे असं आळणी आणि बेचव आयुष्य कधी पासून आवडायला लागलं. मी बराच वेळ ची शांतता भंग केली. त्याने हसून माझ्याकडे पाहिलं. रात्रीचं जेवण उरकून आम्ही पुन्हा तसेच माझ्या खोलीत बसलो होतो. माझ्या हातातलं पुस्तक त्याने ओढून स्वतः त्यात डोकं घालून बसला होता. ते मात्र मला काही बघवेना. तो काहीसा गलात हसला. मी त्याच्याकडे पाहून हलकेच हसले.

“पण आज सहा सात वर्षे उलटून गेली, तरी तुला माझी प्रत्येक आवड लक्षात आहे. मला निसर्गाच्या जवळ जायचंय. काही ठिकाणं मी मनातल्या मनात रेखाटून तुला गंमत म्हणून सांगितलेली ती तू अजून लक्षात ठेवली. मला जेवणात काय आवडतं? एव्हढंच काय, मला आवडणारी चव देखील तू लक्षात ठेवली आणि ते जेवण तूच बनवलं होतं ना? खरं सांग?”

माझ्या लक्षात गोष्टी आलेल्या दिसल्यावर त्याला काय बोलावे सुचेना. त्याने मला उत्तर देणे टाळावं म्हणून हातातलं पुस्तक तोंडावर ठेवून झोपायचा प्रयत्न केला. कदाचित त्याला

भावनिक व्हायला आवडत नसावे. आधी तर तो असा नव्हता. “मी काय बोलतेय?” मी चिडून तो बसलेल्या लाकडी सोफ्याकडे धाव घेतली. मला उत्तर दे! कधी पर्यंत असं गप्प बसणार? तो तोंडावर पुस्तक घेऊन तसाच पडून राहिला. आता मात्र माझी चिडचिड झाली. “बाय, गुड नाईट.”

झोपायचा प्रयत्न करू लागले खरी पण झोप काही येईना. एक दोनदा चोरून त्याच्या कडे पाहिलं. तो मात्र त्याच स्थितीत पहुडला होता. हु, काहीश्या रागाने मी कूस बदलली.

काही वेळ पुन्हा शांततेत गेला असेल कानावर आवाज पडला, “तू आंधळा विश्वास ठेवून आली. माझ्यावर हेच मोठं दडपण आहे माझ्यावर.”

“म्हणजे?” मी आश्चर्याने त्याच्या कडे पाहिलं.

“तू उद्याच परत जा.” तो त्याच स्वरात उद्गारला.

“म्हणजे तू मला सरळ सरळ हाकलून लावतोय?” मी चिडून उत्तरले.

“तस नाही. पण समजून घे इथे जास्त ठीक नाही. सतत भीती असं ते. जंगली प्राणी सुद्धा येतात सरळ आत पर्यंत. तुझी जबाबदारी आहे माझ्यावर आणि उद्या काय आणि दोन तीन दिवसाने काय परत तर जायचंच आहे ना? उद्या मी तुला बसवून

देतो बसमध्ये जा निवांत.'' तो आता आपल्या जागेवरून उठून बसला.

''म्हणजे मला लगेच काढून द्यायचा तू प्लॅनच केला आहे तर.'' मी थंड आवाजात बोलल्यावर त्याला काय बोलावे सुचेना. तो त्या सोफ्यावरून उठून त्या लाकडी दिवाणाच्या कोपऱ्यावर येऊन बसला. आमच्यात जास्त काही अंतर नव्हतं मला त्याचा चेहरा आता स्पष्ट दिसत होता. त्या मिणमिणत्या उजेडात देखील त्याच्या चेहर्या वरची काळजी मला स्पष्ट दिसत होती.

''मला माहीत आहे तू काहीतरी लपवतोयस माझ्या पासून.'' मी पुन्हा त्याच्या चेहऱ्याकडे रोखून पाहत विचारलं.

''काही काय, उगाच काही शंका आणू नको मनात. झोप आता निवांत आणि हो उद्या सकाळी निघायचंय विसरू नको.''

तो पुन्हा त्याच्या जागेवर जाऊन शांत झोपला. पुन्हा तो तसाच दुसरीकडे तोंड करून निवांत पडला होता. त्या मिणमिणत्या दिव्याच्या उजेडात त्याच्या हातावरच्या लाल रेषा दिसल्या जणू कोणी ओरखडून घेतलं असावं. त्याला विचारावेसे वाटलं पण एक गोष्ट आठवली.

आल्या पासून वापरतली ही एकच खोली मी पाहिली. पूर्ण वाडा तर अजूनही पहिला नाही. आल्या आल्या वरच्या कधी कधी

वापरात येणाऱ्या दोन तीन खोल्या मी पहिल्या. बाकीच्या कायम बंद असतात म्हणून आम्ही तिकडे गेलो नाही. तेवढ्या दोन मिनिटाच्या कालावधीत डोक्यात काय काय विचार येऊन गेले असं तील? अंगाला हलका कापरा सुटला होता. सगळं असं डोळ्यासमोर नाचायला लागलं, काय आहे हे? रात्री पाहिलेलं ते सगळं आठवून अचानक हॉरर फील यायला लागला. काय प्रकार आहे हा? सगळंच जरा कोड्यात टाकायला लागलं! तेव्हा असं वाटलं आता एकदा पाहुनच यावं, पण एवढ्या भयाण रात्री, तो किर्रर्र काळोख पाहून नुसती धडधड होतं होती. तोंडावर पांघरुन घेऊन मी गच्च डोळे मिटले. काल मी जशी घाबरंले हे पाहून त्याने अंगणात आणि वापरातल्या खोल्यांमध्ये लाईटची सोय केली होती. आता मात्र तरी आजू बाजूला उजेड दिसत होता. झोपल्या झोपल्या मनात नाना तऱ्हेचे  विचार डोक्यात गोंगावत होते.

कधी तरी मध्यरात्री अर्धवट झोप लागली. काहीतरी कुजबुजल्याचा आवाज येत होता बहुतेक. “सुर्वी.”

“कोणी हाक मारली मला?” मी दचकून उठले. “आईचा आवाज?”

असं कसं होऊ शकतं? आईचा आवाज इथे? मी काहीशी गोंधळले. नक्की इथे काहीतरी भुताटकी आहे. कसंले भास होतायत मला?

“ये श्री, ऐकतो का?” मी मारलेली हाक त्याला कळली नसावी बहुतेक. मी घाबरून दरवाज्याकडे पाहत होते. पुन्हा मी त्याला हाक मारली. “लोढ्या ऐकतोस का? कोणी आहे का बाहेर?” घशातून आवाज निघत नाही. कोणीतरी माझ्या वर येऊन मला खाली दाबायला लागलं. काय होतं ते? मी हवेत हात फिरवत होते; गळ्यातून शब्द बाहेर निघत नव्हता; मला मदत हवीय. काय श्वास गुदमरतोय; काहीच वेळ हात पाय आपटले. काही सुचेना काय करावं कोणी एवढं घट्ट पकडले की कुठलीच हालचाल करता येईना. आता फक्त काहीच क्षण होते माझ्याकडे. मी हारत चाललेय, मला समजत होतं, पण मी आता हेल्पलेस होते.. आता जणू वातावरणातला ऑक्सिजनच कोणातरी काढून घेतला आहे असं जाणवायला लागलं. जड पडलेलं शरीर आणि...अअअ एका मोठ्या किंकाळीने मला जाग आली. घशाला भयंकर कोरड पडली होती. जोर जोरात चाललेला श्वास मला आटोक्यात येईना. तो ताडकन उठून माझ्या जवळ आला.

“काय होतंय सुरे ठीक आहे ना?”

मी सरळ उठून त्याला गच्च मिठी मारली. फुललेला श्वास, सगळं अंग घामाने ओलं चिंब झालं होतं, मी डोक्याच्या केसा पासून तर पायाच्या बोटा पर्यंत थरथरत होते आणि बाहेरचा तो भयानक किर्रर्र काळोख जाणवत होता. अशा भेदरलेल्या अवस्थेत मला पाहून तो ही काहीसा घाबरंल्या नजरेने माझ्या कडे पाहू लागला, "काय  झालं स्वप्न पडले का काही?"

काही वेळ मी तशीच त्याला घट्ट धरून होते. का माहीत नाही पण ती मिठी मला सोडवेना. तो ही काही वेळ तसाच माझ्या डोक्यावरून हात फिरवत राहिला. थोड्या वेळाने मला स्वतःलाच जरा वेगळं वाटलं, हळू हळू हाताची मिठी सैल झाली. लाजेने मी कावरीबावरी झाले, तो हळूच बाजूला झाला, पेल्यात पाणी ओतून त्याने माझ्या समोर धरला. "घे, पाणी पी." तुला बरं वाटेल.

मी एक घोट गळयाखाली उतरवला. तो हरवल्या सारखा माझ्या कडे बघत होता. कदाचित तो ही…

"असं  काय बघतोय?" मी त्याला टोकल्यावर तो काहीसा भानावर आला.

"अ……!!! क…कुठे काय तुला स्वप्न पडलं का काही? झोप आता निवांतपणे मी आहे जागा. काळजी नको करू…."

"अ…हो.. तू जाऊ नको कुठे."

"हो गं बाई, आता कुठेच जाणार नाही डोन्ट वरी."

मी एका कुशीवर पडले होते. तो त्या लाकडी बेडच्या कडेला काहितरी वाचत बसला होता. रात्रीचे दोन वाजत आले असं तील. पण मला काही झोप येईना. बऱ्याच वेळाने जरा डोळा लागला होता. हलकी हलकी झोप यायला लागलीच होती की काहीतरी आवाज आला मी दचकून जागी झाले.

"श्री?" माझी घाबरली नजर त्याला शोधायला लागली. पण तो मात्र तिथे नव्हता. पुन्हा गायब. काय चाललंय हे? भीतीने माझा जीव जायची वेळ आता आली होती.

"कोण आहे तिकडे?" पुन्हा तेच तसाच कुजबुजल्याचा आवाज. कोणीतरी माणसं बाहेर असं ल्याची चाहूल लागली. तशी मी तकडन जागेवरून उठले. लाकडी दरवाजा खोलून बाहेर नजर फिरवली. बाहेर वाड्याच्या जागेत प्रकाश पसरला होता. तरीही ते सगळं भयाण वाटत होतं.

"श्री, कुठेयस?" मी बिचकत पाऊलं टाकत बाहेरच्या दिशेने निघाले. घशाला कोरड पडली होती. अंगावर काटा यायला लागला तशी ती कुजबुज जवळून जाणवायला लागली. कोणीतरी कुजबुजल्याचा आवाज येत होता. तो आता जवळून यायला लागला.

पाय एवढे भयानक थरथरायला लागले होते की मला आता पुढे पाऊल टाकवेना. पाठीमागे पाऊल सरकल तसं मी गर्रकन मागे वळले, खोलीमध्ये जाऊन स्वतःला बंद करण्यासाठी पूर्ण ताकदीने मी दरवाज्याकडे धाव घेणारच होते की मी जागेवर खिळले. माझ्या मागे तीनचार पाऊलं सोडून कोणीतरी उभं होतं, लालबुंद डोळे अस्ताव्यस्त झालेले केस, काळवंडलेला चेहरा आणि कुजका घाण वास,न जाणे कित्येक रात्री जागून काढल्या असं तील असं वाटलं, डोक्याला कापळभर फासलेलं कुंकू आणि चेहऱ्यावरच ते भयाण हसू..!!!

"क…कोण आहेस तू?"

हे…काय होतंय? "भ….भूत" मी जोरात किंकाळी मारली… कानावर हात ठेवून मी जिवाच्या आकांताने ओरडले, "आई…!!!"

मी खडबडून जागी झाले. डोकं अक्षरशः जड पडलं होतं. "आई….." मी डोक्याला हात लावला वेदनेने जीव कासावीस झाला होता.

तो माझ्या बेडच्या बाजूला उभा राहून माझ्या कडे बघत होता. "मॅडम पुन्हा काही स्वप्न पाहिले का?"

मी घामेजलेल्या चेहऱ्यावर हात फिरवत पाणी असं उच्चारलेले त्याच्या लक्षात आलं त्याने पाण्याचा ग्लास माझ्या समोर धरला. "शांत हो."

"दुसरी वेळ आहे तुझी? काही प्रॉब्लेम आहे का?" तो काळजीने म्हणाला.

रात्रीचे 3 वाजलेत आणि तू दुसऱ्यांदा अशी दचकून जागी झालीय. स्वप्न होतं. आता शांत झोप घाबरू नको अजिबात. त्याने माझ्या डोक्यावरून हळुवार पणे हात फिरवला. थारथरणार अंग तापलं होतं. कित्येक वेळ तो असाच शांतपणे माझ्या डोक्यावरून हात फिरवत होता.

सकाळी जाग आली तेव्हा ऊन डोक्यावर आलं होतं. रात्रीची स्वप्न झर झर डोळया समोरून सरकायला लागली. काहीही स्वप्न पडतात मला. तर मी स्वातःच्याच डोक्यात टपली मारून घेतली. त्याला आवाज दिला, बाहेरून त्याची 'ओ' आली.

"उठल्या का मॅडम?" आळस देत देत माझं लक्ष माझ्या अंगातल्या कापड्यांकडे गेलं.

कपडे जशेच्या तसेच होते. मी स्वप्नात पडले होते. खरं असतं तर लागलं असतं मला. पण लागलं तर नाही मला कुठे. चेक करावं म्हनुन मी गुडघ्याला हात लावून पहिला. जोरात सनक

गेली…आई गं….. पायाचा लेहंगा वर करून पाहते तर गुडघ्याला खरंचटलं होतं, हे आणि कसं झालं? म्हणजे ते सगळं? हे देवा, डोकं बंद पडायची वेळ आली आता.

काही क्षण मी तशीच बसून होते. क्षणभर मला काय करावं ते सुचेना. सकाळ झालेली होती एक गोष्ट तर लक्षात आली होती की काहीतरी चुकीचं घडतंय. येऊन फक्त दोन दिवसच झाले असं तील. पण आता अजून इथे राहण्याची हिम्मत माझ्यात नव्हती. त्या गोष्टी आठवून माझं डोकं बधिर व्हायची वेळ आता आली होती. आवरलेल्या बागेची चैन लावता लावता मी त्याला जोरात हाक मारली तो धावतच आत आला. “आलास का?”

“तू निघाली सुद्धा? बरं ठीक आहे मी सोडतो तुला.”

“मी निघते आता. थँक्स, तुझ्या सोबत खूप सुंदर वेळ गेला, छान वाटलं खूप तुला भेटून.” पाठीवर बॅग टाकली आणि मागेही न पाहता मी वाटेला लागले. विचारांच्या तंद्रीत चाललेच होते की तेवढ्यात मागून आलेल्या आवाजाने लक्ष वेधून घेतलं.

“थांब सुरे… डोक्यातल्या एवढया सगळ्या प्रश्नांचं ओझं घेऊन जाशील तर तुलाच त्रास होईल त्याचा.” माझी पाऊलं अडखळली.

क्षणभर थांबून मी मागे नजर फिरवली. डोक्यात हजारो प्रश्न होते. "एका मित्राला शोधायला अशी बाहेर पडते काय, तू असा अचानक भेटतो काय आणि रात्री पडणारी ती भयानक स्वप्न, स्वप्न की सत्य जर ती स्वप्न होती तर अंगावर या जखमा कशा? काय घडतंय? तू मूळचा इथला राहवासी नाही असं तूच सर्वांना सांगत फिरायचा तरीही त्याच्या पूर्वजांनी बांधलेलं वाडा, त्याचा हा वारस, रात्री बेरात्री होणारे भास नक्कीच इथं काहितरी भयानक आहे याची आता मला खात्री पटली आहे." मी त्या वाड्याकडे नजर उंचावून पाहत म्हणाले.

बराच वेळ शांतता पसरली होती. मग हळू हळू त्यानेच त्याची कधीच व्यक्त न केलेली गोष्ट माझ्या समोर मांडायला सुरवात केली.

श्रीयश -

"दहा वर्षाचा होतो फक्त, मला आठवतंय माझे बाबा कायम आजारी असायचे आमच्या छोट्याश्या घरात देखील त्यांनी स्वत्ताची खोली होती. मी एकटा होतो. एकुलता एक पण तरी मला बापचं प्रेम असं काही मिळालं नाही. ते सहसा त्यांच्या खोलीतून

बाहेर निघायचे नाही. मला कधी त्या खोलीत जाण्याची परवानगी नसायची. तस ही मला वडिलांच्या विचित्र वागण्याची भयंकर भीती वाटायची. मनाने धसका घेतला होता माझ्या. मी जास्त कोणाशी बोलायचो नाही. अबोल होतो. आई मला त्रास होऊ नये याची पुरेपूर प्रयत्न करायची. तरी ती गोष्ट माझ्या पर्यन्त पोहोचलीच जिला आई सगळ्यात जास्त घाबरायची.

त्या दिवशी शाळेला सुट्टी होती. आई काही कामासाठी बाहेर गेली होती. मी एकटाच घरी होतो. दुपारी बाबांसाठी जेवणच ताट वाढून त्यांच्या दारावर ठक ठक केलं, ते ताट तिथं ठेऊन मी माघारी फिरायचो. त्यांच्यात आणि माझ्यात संभाषण झालेलं मला कधी आठवत नाही. दार वाजवून माघारी फिरणारच होतो की. आतून आवाज आला, “आत ये..!!!”

त्या आवाजाने मी अक्षरशः थरारलो. “नाही, मी नाही येणार.”

मी तसाच माघारी पळालो. पण तो आवाज डोक्यात घुमत राहिला. ते कधीतरी बाहेर दिसायचे पण जास्त काळ त्या बंद खोलीतच घालवायचे. आईच्या शरीरावर माराचे वळ दिसायचे. तो माणूस मारहाण करायचा तिला खूप. त्याची चीड माझ्या मनात आता भयंकर थैमान घालायला लागलेली. आई आज पासून मी

त्याला जेवण देईल. तू नको जाऊ त्याच्या कडे. आईचा रडवेला चेहरा पाहून माझं मन भरून आलं होतं. मी कधी तिथे जायचा प्रयत्न केला नव्हता पण आता आईसाठी मला ते पाऊल उचलणं भाग होतं. शेवटी मी ठरवलं आता जायचंच. आई समोर मी धीट म्हणून उभे राहिलो. तिलाही विश्वास वाटला असावा त्या दिवशी पासून तिने ही तिच्या नवऱ्याची म्हणजे माझ्या तथाकथित बापाची जबाबदारी माझ्या कडे दिली.

पहिल्या दिवशी मी घाबरंलो. पण तरी आत जायची हिम्मत केली. त्या अंधाऱ्या खोलीत मी आधी आलो नव्हतो असं काही नव्हतं, पण तो जेव्हा नसायचा तेव्हाच मी त्या खोली मध्ये गेलेलो. आज बापू असं ताना मी पहिल्यांदा आत जात होतो. जेवणाचं ताट थरथरत होतं हातात. ती खोली आई साफ करायची. त्या मूळे जरा नीटनेटकी दिसत असं ली तरी सतत तिथून कुजका वास यायचा. तो वास धूप दिव्यांच्या धुराने कमी जाणवत होता. आत मोठा देव्हारा आहे हे मला आता कळालं. बापू सतत त्या देव्हाऱ्या समोर बसतो असं  आई कडून ऐकलेलं. आताही तो तिथेचं बसला होता, कसंलासा जप करत. मी हळूच जाऊन मागे उभा राहिलो आहे हे त्याच्या लक्षात आलं असावं. मागे वळून पाहिलं तस त्यांचा चेहरा दिसला, भस्म फासून सगळं अंग माखल होतं. ते पाहून माझी भिती जराशी कमी झाली.

आत काहीतरी भुत वगैरे असं लं त्यांच्या अंगात येत असेल असं काहीसं  मला वाटत होतं. ते भूत अंगात येतं मग बाप आईला मारतो असंच काहीसं मला वाटायचं. सगळीकडे देवाच्या तसबीरी धूप दिवे पाहून जरा भीती चेपली. आत बऱ्या पैकी उजेड होता. मला वाटलं होतं तस वातावरण मात्र तिथं नव्हतं.

"बैस हितेश्वर बैस." माझ्या पूर्ण नावाने हाक मारली आणि देव्हाऱ्या समोरून उठत ते माझ्या समोर आले. आता पर्यंत माझ्या मनात त्याच्या विषयी भयंकर चीड होती. पण का कोण जाणे तेव्हा असं वाटलं की मी त्यांना चुकीचं समजत होतो.

मला बाहेर दिसणारे माझे बाबा आणि आता दिसणारे बाबा यात जमीन आस्मानाचा फरक वाटत होता. बाहेर मला विचित्र वागणारा माणसांची  ॲलर्जी असं लेला माणूस असाच तो माहीत होता. आमची गट्टी जमली बापू मला गोष्टी सांगायचा, ज्ञानाच्या गोष्टी सांगायचा, पण तो असा का खोलीमध्ये बंद असायचा कळायचं नाही. बराच वेळ तो एकटं कुणाशीतरी बडबडत असं ल्याचं मी पाहिलं आणि मी जवळ गेलो. त्या दिवशी खरी भयानकता अनुभवली. जेव्हा कधी तो नॉर्मल असायचा तेव्हा कसंलीच भीती नसायची पण. माझा बाप मानसिक रुग्ण होता.

अंगात भूत संचरल्यासारखा तो वागायचा, स्वतःत भिंतीवर डोकं आपटून घायचा, त्या दिवशी त्याने मला मार मार मारलं.

त्या नन्तर मी फक्त त्याला जेवणाचा थाळा द्यायला जायचो. तो ही बाहेरूनच ठेऊन माघारी फिरायचो. काही दिवसांनी त्यांनी जेवण सोडलं असावं असं वाटलं. सलग दोन दिवस ताटं तशीच माघारी अली तेव्हा मी आत जाऊन पाहून यावं असं आईने सुचवलं.

बापू त्याच्या खाटेवर निपचित पडलेला, शांत... माझी चाहूल लागली तशी त्या निपचित पडलेल्या देहात हालचाल जाणवली.

त्या दिवशी माझ्या हातात हात घेऊन हळू आवाजात काहीतरी पुटपुटत होता. आवाज ऐकण्यासाठी म्हणून मान झुकवली. अंगातून भायानक कळ सगळ्या अंगभर पसरली. मानेवर ठेवलेला थरथरता हात अचानक ताठ झाला. ना जाणे कुठल्या ताकदीने तो गडगडाटी हसला. मानेत रुतलेली नखं, अंगावर रक्ताचे ओहळ सांडवत होती. त्या अचानक झालेल्या हल्ल्याने मी अक्षरशा थरथरत होतो. घशातून आवाज निघत निघेना. आता आपला अंत इथेच होतो की काय? असं  क्षणभर

वाटलंच होतं की , त्याची पकड ढिली झाली ती कायमचीच. जीव घेऊन मी तिथून पळालो.

बापू गेला तशी ती खोली कायमची बंद केली गेली. ते घर सोडलं ते कायमचं. पण तिथून सुरवात झाली त्या गोष्टींची, मला बापू दिसायचा. आमच्या सोबत आमच्या नवीन घरी राहायचा माझ्याशी बोलायचा, मला सतत तो सोबत असं ल्याचा भास व्हायचा. काही महिन्यातच मी स्वतःला वेगळं करून घेतलं. रात्री काय व्हायचं मला माहित नाही, पण सकाळी उठल्यावर माझ्या अंगावर ओरखडे आणि मराच्या खुणा मला दिसायच्या. कोण संचारत माझ्या अंगात? किंवा रात्री काय होतं याची काहीच कल्पना नसायची. पण आपल्यामुळे आपल्या घरातल्यांना त्रास होतोय हे लक्षात यायला लागलं होतं. आईने मात्र या वेळी वेगळं पाऊल उचललं.

आई, आजोबा, आजी सगळेच काळजीत दिसायचे. त्या दिवशी ही मी स्वतःला खोलीत बंद करून बसलो होतो. काही लोक मला न्यायला आले होते. सरळ सांगायचं तर मी वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये दाखल झालो. तिथं जे अनुभवलं ना ते आठवलं तरी अंगावर काटा येतो.

"मी वेडा नाही रे. विश्वास ठेवा." आता मी कसं समजावून सांगू. ओरडणारी लोकं, वेडे. ठार वेडे आणि त्यातलाच एक काही मोठे काही लहान, मी वेडा होतो का? कदाचित तस असेल ही. जसं आई सांगत होती, तू दिवसा एक असं तोस आणि रात्री एक. कदाचित असेल डॉक्टरांनी ते अनुभवलं असेल कारण माझा वेडेपणा आता वाढत चालला आहे हे माझ्या लक्षात येत होतं पण माझा स्वतःवर असा कुठलाच ताबा नव्हता. दिवस दिवस खाटेला बांधून ठेवायची ही लोकं मला."

बोलता बोलता त्याचा कंठ दाटून आला.

"रात्र रात्र ओरडायचो, अंगावर करंट झेलले, वारंवार दिलेल्या शिक्षेनी मी खूप हळवा झालो होतो. दोन वर्षांनी घरी आलो तेव्हा मात्र मी भूतकाळ मागे ठेवला. आई ने कधी माझ्या शिक्षणासाठी कुठली कमी ठेवली नाही. पण या सगळ्यात ती थकली होती. माझ्या आजारपणा मुळे आम्हाला सतत घर बदलत राहावी लागायची. लोकं नको नको ते बोलायचे. चेटूक - करणी करतात ही लोकं असं म्हनून छि थू करायचे. माझं शिक्षण हे असंच झालं. काही इथे काही तिथे. मुंबईला गेलो तिथे तीन वर्षे काढली. सगळ्यांना आम्ही आमची खोटीच ओळख द्यायचो मग जास्त विचारपूस झाली तरी उत्तर ठरलेली असायची. तुम्हाला सांगितलेलं

ही तसच काहीसं आम्ही मूळचे इथलेच, आजोबांचा पूर्वजांनी बांधलेला हा वाडा. माझं शिक्षण पूर्ण झाल्यावरच आम्ही पुन्हा इथे आलो. वाटलं होतं की आता सगळं ठीक होईल. आम्ही भूतकाळ मागे सोडून नवीन आयुष्य सुरू करण्याचा विचार करूनच आनंदी होतो. पण तो ही जास्त काळ टिकला नाही, खरं तर बापू ने मला सोडलं खरं पण त्याच्या बालपणीच्या आठवणीतला हा वाडा मात्र त्याचाच राहिला कायमचा."

"म्हणजे?" माझ्या सुरातला ओघ त्याच्या लक्षात आला.

"म्हणजे तू जे काही अनुभवलं ते सगळं तेच होतं. माझी नियमित औषध गोळ्या चालू असायच्या त्यांचा नेम चुकला ही हळू हळू पुन्हा त्याच दिशेनं वाटचाल सुरू व्हायची. एक चिडखोर व्यक्ती जणू माझ्यात अजून एक अस्तित्व आहे असं भासायचं. आई तो साठा कधी संपू द्यायची नाही. त्या गोळ्यांच इफेक्ट असेल का काय माहीत नाही पण मी प्रमाणाबाहेर जाड झालो. शाळेत खुप सहन करावा लागायचं. शाळेत एक मुलगी जी मला पहिल्या दिवसा पासून आवडायची. तीलाही कधी बोलता आलं नाही. पहिल्यांदा वर्गात आलो आणि तिला पाहिलं, जराशी आगाऊ आणि एकदम खडूस. तरी मला आवडायची कधी बोललो नाही.

मी होतो ही असा बेढब जाड कोणत्या तोंडाने बोलणार होतो. कोणीतरी आवडतं, त्याची मर्जी राखण्यात दिवस कमी पडायचा.

"एक मिनिट? मर्जी?" मी आश्चर्याने त्याच्या कडे पाहिलं. त्याची मान खाली होती. तो त्याच शांततेत एका एका आठवणीला उजाळा देत होता.

"एक मिनिट मर्जी म्हणजे कोणाची मर्जी शाळेत तर नेहमी आपण दोघेच असायचो आणि तू कधी? म्हणजे तू माझ्यावर प्रेम करायचा तरी कधीच तस जाणवू देखील दिल नाही."

मी समजायचं ते समजले आहे हे लक्षात आल्यावर तो हळूच तिथून उठून जायला निघाला.

दगडी चौथऱ्यावर बसलेलो आम्ही दोघे निशब्द होतो. त्याची पाठमोरी माझ्या पासून दूर जाणारी आकृती पाहून मी झटकन उठून त्याचा हात ओढून घेतला. घट्ट मिठी ने आमच्यातल अंतर संपवलं. त्याच्या उष्ण श्वास जाणवत होता. सोबत दोघांच्या शरीराची होणारी धडधड एकमेकांना स्पष्ट ऐकू जाईल अशी वाढली. त्याचा नकळत मानेखाली रुळणार हात वेगळयाच धुंदीत घेऊन गेला, त्याने हलक्या हाताने केसांना कुरवाळत हळूच मान उचलली, एकमेकांचे उष्ण श्वास एकमेकांत मिसळले. ओठावर टेकलेले ओठ कितीतरी वेळ शिवशीचा खेळ खेळत होते. उरले होते ते फक्त मौन.

घट्ट मिठीचा विळखा त्या क्षणी तरी आम्हाला सोडायचा नव्हता. काही वेळ असाच गेला. निशब्द.....

मग ती वेळ आली जेव्हा वेळ काळ आणि प्रसंग याची अचानक आठवण होते तेव्हा उडणारी तारांबळ, जसे विजेच्या झटक्याने एकत्र आलो तसेच झटका लागावं तसे दूर झालो. लाजेने मान खाली घालण्याची वेळ माझी होती. कारणं सुरवात तर मीच केली होती. त्या क्षणी वाटणारी भावना मी शब्दात सांगू शकत नव्हते. पाठमोरी उभी असं लेली आणि लाजेने लाल झालेली मी पुन्हा एकदा शहारले ती त्याच्या मिठिने. पाठमोरी मी त्याच्या भक्कम मिठीत किती सुरक्षित वाटत होतं की क्षणभर वाटलं ही आयुष्य भरासाठी अशीच रहावी.

“तू हे सगळं आधी का नाही बोललास?” पुन्हा एकदा शांत वातावरण मी काहीतरी विषय छेडवा म्हणून बोलले.

“ह...... कोणत्या तोंडाने बोलणार?” त्याच्या स्वरात एक दुःखाची झळ दिसली. “मघाशी थोडा बहकलो. माफ कर पण नात्याला अर्थ ही नाही. मी असा वेडा.”

“अरे.... असं का बोलतोस?” मी त्याच वाक्य तोडत म्हणाले.

“हो आहे मी वेडा. मला फक्त तुझ्या जवळ एकदा व्यक्त व्हायचं होतं. एवढी वर्ष तुझी वाट पाहिली. या क्षणाची मी किती आतुरतेने वाट पाहत होतो. आता मनात काही मळभ नाही. माफ कर पण आपला प्रवास इथपर्यंतच होता. आई, बाबा, आजी, आजोबा, आजी. माझं कुटुंब यातल्या प्रत्येक व्यक्तीने माझ्या समोर जीव सोडला. मी असं ह्य होतो. आजही आहे, काहीच करू शकलो नाही. पण असो, मी आता ते उगाळत बसणार नाही. पण तुझ्यासोबत घालवलेला प्रत्येक क्षण खूप सुंदर होता. आपला प्रवास एवढाच.”

“तू.... काय बोलतोयस तू.?” माझ्या आवाजातला कंप स्पष्ट जाणवत होता. हे काय आहे मला माहित नाही. पण जेव्हा पासून तू मझ्या पासून दूर गेलास तेव्हा पासून मी मनाने तुझ्या सोबत असायची, आपली मैत्री खूप आठवायची तुझ दिलखुलास हसणं आठवायचं. मनाने तुझ्या जवळ पोहचायची. आज एवढ्या वर्षांनी भेटलो मी नव्याने तुझ्या प्रेमात पडले. ते वय नव्हतं समजायचं पण आता समजतंय मला परिस्थितीची कल्पना आहे. पण तरीही, साथ देशील? तू जसा आहेस मला मान्य आहे. पुन्हा भविष्यात काही घडलंच तरी मी ठाम पणे तुझ्या सोबत उभी असेल.”

"तो काहीसा अस्वस्थ जाणवला. निघताना सोबत घेऊन निघालेली ती बॅग त्याने गाडी मध्ये टाकली. गाडीचा हॉर्न वाजवून तो फक्त एवढंच म्हणाला, "परिस्थितीच गांभीर्य तुला नाही. मी या स्थितीत तुला स्वीकारू शकणार नाही. माफ कर."

कुठलाही वाद न घालता मी गाडी मध्ये बसले. तो गाडी घेऊन मला स्टेशन पर्यंत सोडायला आला. ट्रेन मध्ये बसे प्रयत्न आमच्यात काहिच संवाद नव्हता. मला खरं तर राग येत होता. कुणाचा? ते माहीत नाही पण. हुरहूर मात्र नक्कीच होती. गाडी सुटली तो गाडी दिसेनाशी होई पर्यंत तसाच उभा होता. मी स्वतःच्याच विचारांमध्ये गुंग होते. विचार करून माझं डोकं थंड पडलं होतं, जास्त काही स्वतःच असं  सुचेना पण एक गोष्ट मात्र मी स्वताशीच पुतपुटले. तुला मी असं  इतक्या सहज तरी दूर जाऊ देणार नाही.

गेले दोन तीन दिवस बंद असं लेला फोन उघडला. आई-बाबांना फोन केला तशी कधीच कल्पना दिली असं ल्याने जास्त ओरडा बसला नाही. तरीही नाही म्हणून ऐकावे लागलेच. "आई काळजी करू नको. मी येते लवकरच इकडे नेटवर्क नाही काळजी करू नका. मित्र आहेत सोबत, आम्ही आता पर्वतावर चढाई करणार आहोतं." असं बोलुन मी फोन ठेवला.

मित्र मैत्रिणीसोबत फिरायला चालले आहे, अशी थाप मारून मी घरून निघालेली. सोबत मोठी टीम आहे आणि कसंलीच भीती नाही हे तर खुप पटवून दिलं होतं. नाहीतरी काय करणार? कोणी शाळेतला मित्र आठवतो म्हणून त्याचा शोध घ्यायला मला एकटीला कोण येऊ देईल? परवानगी मिळणे हे मात्र शक्य नव्हतं.

काही अनुत्तरित प्रश्नाने माझी पाऊलं पुन्हा मागे वळाली. काहीतरी गुंता आहे या सर्वात. तो काही लपवतोय का माझ्या पासून? जे काही आहे मला आता छडा लावायचाच होता. काही तरी गडबडलंय एवढं मात्र नक्की. जात असं ताना काही गोष्टी मात्र लक्षात यायला लागल्या. गावात कुणालाच त्याच्या बद्दल माहिती नाही असं कसं होऊ शकत? गावात गेल्या गेल्या मी आधी रामुच्या घराकडे मोर्चा वळवला. पण जस वाटलं होतं तसच झालं, तो गायब…

काहीतरी गौडबंगाल आहे हे मात्र नक्की झालं.

पण मनाच्या कोपऱ्यात त्याची काळजी वाटत होती. त्या भूत बंगल्यात परत जायची इच्छा नव्हती. पण एकदा मला माझ्या मनाची शांती हवी होती. संध्याकाळ व्हायला आली होती, झपझप पावलं टाकत मी वाड्या समोर पोहोचले. भव्य वाडा तसाच

दिमाखात उभा होता. सगळीकडे  शांतता पसरलेली. जोरात आवाज दिला, “हॅलो....”  तसा तो आवाज चारी बाजूला घुमला.

“श्री, तू आहेस का ईथे?” कसंलाच प्रतिसाद नाही. काही वेळ मी उत्तराची वाट पाहिली. छे, काही उत्तर नाही. जाऊदे मीच आत जाते. मी स्वताशीच पुटपुटले.

पाठीवरची बॅग त्या चौथऱ्यावरच टाकून त्या दुमजली इमारतीच्या वरच्या खोल्यांकडे जायला लाकडी पायऱ्यांचा तो रुंद जिना चढायला लागले. जिन्यातला अंधात वाहून वर चढायची इच्छा होतं नव्हती. मात्र तरीही मी हिम्मत करून आत जायला निघाले, “श्री, ऐकतोस का? श्री?” कित्येकदा हाक मारूनही त्याने ओ दिली नाही. आता मात्र मला शंका यायला लागली, मला सांगितलेली माहिती पूर्णपणे खरी नाही. यात काहीतरी खोट नक्कीच आहे जे माझ्यापासून लपवलं जात आहे. थरथरत्या पावलांनी मी जिना चढत होते, या बाजूला मी आधी का आले नाही याचा विचार करत असं तानाच समोर एक भलामोठा हॉल नजरेस पडला. भीतीनं घशाला पडलेली कोरड पाहून आणि वर सुन्न झालेलं डोकं ते समोरच दृश्य पाहुन काय प्रतिक्रिया द्यावी हेच कळेना. खिडकीतून येणार सौम्य प्रकाश आणि खिडक्यांच्या फटीतून वाहणारी हवा अजूनच अंगावर काटा उभा करत होती.

समोर त्या मोठ्याश्या दगडी चौथऱ्यावर एक पेटी ठेवलेली दिसत होती, मी थरथरत्या हातानेच त्यावरची धूळ साफ केली. कुरकरुणारी कडी काढत भीतीचा आवंढा गिळत पेटीची कडी काढून आत डोकावले. ई.....!! त्या  कुजलेल्या मांसाच्या घाण वासाने ओकारी आली. समोर जे बघत होते ते पाहून मी धाडकन जमिनीवर कोसळले.

"सूरी..." त्याचा आवाज कानावर पडला. तोच मोहक आवाज मला त्याच्याकडे आकर्षित करत होता. डोळे किलकिले करून मी आजूबाजूला नजर फिरवली. मात्र तो कुठेही दिसेना. "तू... कुठेयस मला दिसत का नाही.?" मी घाबरल्या स्वरात थार्थरणारा स्वर लपवत म्हणाले.

"तू का आलीस परत सुरे? तू का आलीस?" त्याचा आवाज त्या हॉल मध्ये घुमत होता.

"मी? मी का आले? तू कोण आहेस? मला सांग तू कोण आहेस इथे काय करतोस?"

"मी? इथे का? ऐकायचंय तुला?" तो कुत्सित हास्य हसला. तू का आलीस इथे? का आलीस? मी बोलावलं?" तो पुन्हा त्याच कुत्सित स्वरात हसला.

"म्हणजे?" मी गडबडून विचारलं.

“म्हणजे या वेळी मात्र मी तुला बोलावलं नाही. तू स्वतःहून आलीस.”

अंधाऱ्या जागेतून तो पुढे आला त्याचा तो भयानक अवतार पाहून मन थर्रर्रल आता त्याच्या चेहऱ्यावर क्रूरता दिसत होती, “श्री, तू बरा आहेस ना?”

“हे बघ श्री, मला माहित आहे तू कोणत्या परिस्थिती मध्ये आहेस. पण घाबरू नको मी आहे तुझ्या सोबत, कायमची. आपण चांगल्याल्या चांगल्या डॉक्टरांकडे जाऊ. तुझ्यावर चांगले उपचार घेऊ.” मी त्याच्याकडे एक एक पाऊल टाकत पुढे सरकत होते. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीत मात्र कुठलीच हालचाल नव्हती.

“श्री, ऐकतोयस ना?” मी आवंढा गिळत त्याला विचारलं. तो काहीसा भावनिक होऊन विचार करत असावा. एवढ्या वेळात मला समाजयचे ते मी समजून गेले होते. तो पुन्हा त्याच स्थितीत होता ज्याची तो स्वतःलाच भीती होती. फक्त अजून काही वेळ मला वाट पहायची होती. मात्र नियती याहून वेगळी असावी.

त्याच्या पाठमोऱ्या आकृतील मी हाताने स्पर्श करणार तेवढ्यात बाहेर अबुलन्सचा आवाज घुमू लागला. त्या आवाजाने त्याने चमकुन माझ्याकडे पाहिलं, पुढे काही घडायच्या आत त्याने रागाने माझा गळा आवळला. “का? असं का केलंस तू?” त्याचे

डोळे रागाने लालबुंद झालेले मला दिसत होते. त्याच्या घोगऱ्या आवाजाने खोलीत आवाज दुमदुमला.

“तुला बरं करण्यासाठी आम्ही मदत करू श्री. विश्वास ठेव.” माझ्या गळयाभोवतीचा पाश घट्ट होतं होता, “आता हा खेळ माझ्या मरणा सोबतच संपेल.” तो त्याच घोगऱ्या आवाजात म्हणाला. श्वास घेणं आता जवळजवळ बंदच झाल्यात जमा होता, मी श्वास गुदमरून डोळे झाकले तोच माझ्या गळयाभोवतीचा त्याचा हात सैल झाला, भोवळ येऊन तो स्वतःच खाली कोसळला.

“श्री....”

कुठल्याश्या काळया कोठडीत मला डांबून ठेवलं होतं. मी पहिल्यापेक्षा जास्तच अस्वस्थ होतो, कारण आता मला माझा भूतकाळ छळायला लागला होता. भूतकाळाचे अनेक ओरखडे माझ्या मनावर अजूनही ताजेच होते. त्या आठवणीने नकळत हात मानेवर गेला, जुन्या आठवणीचे ओरखडे मनावर आता हावी व्हायला लागले. “नाही नाही, मी काही केलं नाही. प्लिज मला सोडा.” मी ओरडत होतो. किंचाळत होतो मात्र कुणीही माझं काहीच ऐकलं नाही.

भयानकता वाढवणारा तो अँबुलन्स चा आवाज माझ्या डोक्यात इतका भिनलेला होता की जुन्या आठवणींच्या नुसत्या ओझरत्या विचाराने मी बेभान होतं होतो. पण हे लोक असं का वागतात, काही झालेलं नाही मला मी कुठेही जाणार नाहीय मी ठणकावून सांगितलं. पण ते ऐकायला तयार नाहीत. "आई....!" मी रडलो, किंचाळलो, माझ्या आरडा ओरडण्याचा त्यांच्यावर काडीचाही फरक जाणवला नाही. विनवण्या केल्या पण त्या चार लोकांची घट्ट पकड मला सोडवता येईना. मला दंडाला धरून ओढणाऱ्या चा मी हातावर कडकडून चावा घेतला. त्यांच्या विळख्यातून सुटायचा हा प्रयत्न ही काही जमला नाही. दोन मजबूत हातानी घट्ट विळखा घातला. मागून जोरात तडाखा बसला तशी त्या अंधाऱ्या खोलीत मी कोलमडलो. अगं दीच बंद आत हवा तरी कुठून येत होती ते कळलं नाही. पण मी कितीही आरडा ओरडा जरी केला असं ता तरी काही उपयोग नव्हता. माला जायचं नाहीय पण... जावं लागेल.

एका कोपऱ्यात शांत बसून घेतलं, स्वताशीच एक गडगडाटी हसू हसलो. का कळत नाही या लोकांना त्या शक्ती ज्या मी अनुभवतो. ते सगळं.... कसं समजावू?

वेडा नाही मी. पण काही गोष्टी आहेत ज्या मला पूर्ण कराव्या लागतील. तुझ्या मनात चालेली प्रत्येक गोष्ट माझ्या लक्षात येतीय. मी त्या ठिकाणी ज्या गोष्टी अनुभवल्या त्या खऱ्या आहेत. दुनियेसाठी मी नक्कीच वेडा आहे पण मी बरा होऊ शकत नाही. माझी सुटका माझ्या मरणानंतरच.

सुर्वी -

रात्री उशिरा घरी येऊन बॅग ठेवली मी त्याच्याच विचारात होते की टेबलावर ठेवलेला फोन खाणानला. “हॅलो सुर्वी मॅडम का? मॅडम, तुम्ही ॲडमिट केलेल्या पेशन्टने गळफास लावून घेतला. जागेवर गेला बिचारा.” समोरच्याचे शेवटचे शब्द अस्पष्ट ऐकू आले. कानात फक्त त्याचे शब्द घुमत होते, “माझी सुटका माझ्या मरणानंतरच” माझ्या शिक्षण आणि मानसशास्त्र इथे हरलं होतं. त्याला शोधण्यासाठीची धडपड , माझं प्रेम हरलं होतं. अंगातले त्राण संपले तशी डोळ्यासमोर अंधारी आली. मी धडकन जमिनीवर कोसळले.

त्याच्यासोबत अनुभवलेली एक एक गोष्ट डोळ्यासमोरून जात होती, मला होणारे भास होते की सत्य? या कोड्यांबरोबरं तो ही एक कोडं बनून राहिला, कायमचा.


आज तीस दिवस झाले माझ्या रूम मध्ये मला आता खूप सुरक्षित वाटायला लागलं होतं. म्हणजे मी कुणालाही आमच्या दोघांच्या विचारांत व्यत्यय आणण्यासाठी जागाच दिली नव्हती. पण त्या दिवशी कोणीतरी दार धडकन तोडलं...!! कुठलेसे लोक येऊन मला चला म्हणत आहेत. मी त्यांना विचारलं श्री तिथेच एक का..? ते हो म्हणालेत, बर झालं तो असेल त्याला भेटता येईल...,

पण कुठे आणून सोडलं यांनी मला आजूबाजूची लोकं ओरडतात माझ्या विचारांत व्यत्यय येतो. मला नाही आवडत. अजिबात नाही आवडत .. म्हणून काल त्या एका बाईचं डोकं मी भिंतीवर आपटून आपटून तिला शिक्षा केली, हो केलंच पाहिजे ना आम्ही दोघे बोलत असताना सारखी मध्ये मध्ये लुडबूड करत असतात हे. आता आमच्या दोघात मी कुणा कुणालाच येऊ देणार नाही..!!

End...

पुस्तकाच्या कव्हरवर एक क्लिक करून पहा.



**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्ष.**

**स्वीटी महाले यांचं ई साहित्यचं हे तिसरं पुस्तक.**

यापुर्वीची त्यांच्या कादंबऱ्या वाचकांना अतिशय आवडल्या. कथा रंगवण्याची त्यांची शैली, मानवी स्वभावातील बारकाव्यांची जाण आणि कल्पकता हे त्यांचे वैशिष्ट्य. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. पण त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्या-मुळे त्यांच्या पुस्तकविक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता इंटरनेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत नेण्याचे काम अनेक संस्था करत आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ६ लाख वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यचे प्रयत्न चालू आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार

झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, कुमार सोनावणे, प्रतिक उकले, सुजाता सिद्धा, गायत्री रोडे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत.ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?